दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

बुधवार, दि. २० मे २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १४४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# ४३ नव्या जातींच्या समावेशाचा प्रस्ताव

## ओबीसी क्रिमीलेअर मर्यादा ८ लाखांवरून १५ लाख करण्याची शिफारस



**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील ओबीसी समूदायासाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. ओबीसी नॉन क्रिमीलेअर (OBC Non Creamy Layer) मर्यादा 8 लाखांवरून 15 लाख करण्याची शिफारस करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत लवकरच बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

याचसोबत ओबीसी समूदायात 43 नव्या जातींच्या समावेशासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याचा निर्णयही ओबीसी उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. ओबीसी जात पडताळणीच्या प्रलंबित प्रकरणांवर तातडीने निर्णय घ्यावा असे निर्देशही देण्यात आले आहेत.

ओबीसी उपसमितीच्या बैठकीत ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलतींवरही चर्चा करण्यात आली. चुकीच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप देऊ नयेत अशा सूचनाही देण्यात आल्या.

ओबीसी समाजाच्या उन्नतीसाठी शैक्षणिक सक्षमीकरण आणि आर्थिक उन्नतीच्या विविध योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. राज्य शासनाने स्वतंत्र इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्थापना करून ओबीसी, विजाभज, एसबीसी आणि इतर मागास घटकांसाठी विविध कल्याणकारी योजनांना गती दिली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, परदेशी शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना 100 टक्के फी सवलत देण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.

ओबीसी विभागामार्फत आश्रमशाळा चालविण्यात येत असून ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जात आहे. राज्यातील36 जिल्ह्यांमध्ये मुला-मुलींसाठी एकूण 72 वसतिगृहे सुरू करण्यात आली असून यासाठी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'स्वयंम' योजना सुरू करण्यात आली असून या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना राहणीमान आणि शिक्षणासाठी 60 हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते. महाज्योती संस्थेमार्फत यूपीएससी आणि एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून यूपीएससीमध्ये 29 तर एमपीएससीमध्ये 118 विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असल्याची माहिती त्यांनी दिली. स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ओबीसी महामंडळामार्फत युवकांना 15 लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जात असून या कर्जाला शासन हमी देते.

तसेच प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ न मिळालेल्या घटकांसाठी 'मोदी आवास योजना' सुरू करण्यात आली असून घरकुलासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे. याशिवाय सौरऊर्जेसाठी स्वतंत्र अनुदान दिले जात असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

ओबीसी कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता अधिक वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असून समितीकडून प्राप्त होणाऱ्या सूचनांचा विचार करून आवश्यक सुधारणा करण्यात येतील असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

# फक्त स्मरणशक्तीच्या जोरावर मनीषा मांढरेंनी फोडला पेपर : यंत्रणाही अवाक्

**पुणे (दै. संध्या)**



नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयच्या तपासातून एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे, ज्यामध्ये संशयित मनीषा मांढरे हिने बायोलॉजीचा पेपर फोडताना कोणत्याही प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेचा किंवा मोबाईलचा वापर केला नसल्याचा खळबळजनक खुलासा झाला आहे. दरम्यान, या गुन्ह्याचे मूळ आणि तांत्रिक दुवे शोधण्यासाठी न्यायालयाने मनीषा मांढरेला 14 दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात आता या संपूर्ण प्रकरणाचा मास्टरमाईंड शिवराज मोटेगावकर असल्याचे उघड झाले असून, त्यानेच पी.व्ही. कुलकर्णी आणि मनीषा मांढरे या दोघांची एनटीएच्या पॅनेलमध्ये वर्णी लावल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मोटेगावकरने रचलेल्या या कटानुसार मनीषा मांढरेची बायॉलॉजी आणि कुलकर्णीची केमिस्ट्री या विषयांचे पेपर सेट करण्यासाठी निवड करण्यात आली होती, जेणेकरून हे दोघेही थेट मोटेगावकरपर्यंत पेपर पोहोचवू शकतील. अखेर, मोटेगावकर हा पेपर लीक करणाऱ्या एका मोठ्या आंतरराज्य टोळीचा सक्रिय सदस्य असल्याचा खुलासा झाला आहे. संशयित आरोपी मनीषा मांढरे हिने पेपर फोडण्यासाठी कोणताही कागद किंवा मोबाईल न वापरता थेट आपल्या तल्लख स्मरणशक्तीचा वापर केल्याचा खुलासा झाला आहे. तिला परीक्षेचे सर्व प्रश्न तोंडपाठ असल्याने तिने मागे कोणताही तांत्रिक किंवा प्रत्यक्ष पुरावा सोडलेला नाही, ज्यामुळे सध्या सीबीआयसारखी मोठी तपास यंत्रणाही चक्रावून गेली आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com

# यूपीएससी वन सेवा परीक्षेत बार्टीच्या विद्यार्थ्यांनी मिळवले यश

**मुंबई (दै. संध्या)**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत मार्गदर्शन घेतलेल्या दोन विद्यार्थ्यांनी संघ लोकसेवा आयोगाच्या भारतीय वन सेवा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ४ मे २०२६ रोजी जाहीर झालेल्या अंतिम निकालात कबीर राहुल कांबळे यांनी १२५ वा तर अक्षय विजय बर्हे यांनी १४० वा क्रमांक मिळवत यश प्राप्त केले. या दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय बार्टी संस्थेकडून मिळालेल्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्याला दिले आहे.

बार्टी संस्थेमार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना यूपीएससी पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा तसेच मुलाखत चाचणीच्या तयारीसाठी प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य दिले जाते. भारतीय वन सेवा २०२५ मुख्य परीक्षेसाठी ५२ विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात आले होते, तर त्यापैकी १० विद्यार्थ्यांनी मुलाखत आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतला होता. या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेच्या विविध टप्प्यांवर बार्टी संस्थेकडून तज्ज्ञ मार्गदर्शन, अभ्यास साहित्य आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी करण्यास मोठी मदत झाली.

बार्टीच्या मार्गदर्शनाखाली यश संपादन करून प्रशासकीय सेवेत प्रवेश करणाऱ्या या दोन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे 'बार्टी'च्या महासंचालक दीपा मुधोळ-मुंडे, निबंधक डॉ. सुचिता शिंदे आणि विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# अजित पवारांच्या मृत्यूशी अशोक खरातचा संबंध!

## मृत्यूच्या ६ दिवस आधी खरातने बदलले ४ मोबाईल, अंजली दमानियांचा दावा

**मुंबई (दै. संध्या)**




अजित पवार यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणात अशोक खरात याची सविस्तर चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या मृत्यूच्या अवघे 6 दिवस आधी अशोक खरातने तब्बल 4 मोबाईल फोन बदलल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या संशयास्पद हालचालींमुळे अजित पवार यांच्या मृत्यूचा थेट संबंध खरातशी असल्याची दाट शक्यता अंजली दमानिया यांनी व्यक्त केली असून, या प्रकरणातील सत्य बाहेर आणण्यासाठी त्याची कसून चौकशी करण्याची आग्रही मागणी त्यांनी केली आहे. अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत दिवसेंदिवस संभ्रम वाढत असून, हा केवळ अपघात होता की जाणीवपूर्वक केलेला घातपात, असे अनेक प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. यातच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सीडीआर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने एक अत्यंत धक्कादायक खुलासा केला आहे. त्यांच्या दाव्यानुसार, संशयित अशोक खरातने आपला फोन सर्व्हिलन्सवर असल्याच्या भीतीने सतत हँडसेट बदलले असून, यापैकी एक हँडसेट तर केवळ 19 मिनिटांसाठी आणि एकाच फोन कॉलसाठी वापरून बदलण्यात आला होता. त्यामुळे या विमान अपघाताचे गूढ आणखीनच वाढले असून, या प्रकरणाच्या तपासाला आता एक नवे वळण मिळाले आहे. अंजली दमानिया यांनी दिलेल्या माहितीनुसार, अशोक खरात याने 21 ते 31 जानेवारी या अवघ्या 10 दिवसांच्या कालावधीत तब्बल 5 वेळा आपले मोबाईल हँडसेट बदलल्याचे समोर आले आहे. यात सर्वात महत्त्वाची आणि धक्कादायक बाब म्हणजे, 27 ते 31 जानेवारी दरम्यान त्याने एक फोन वापरला आणि त्यानंतर तो पुन्हा कधीही वापरला नाही. तसेच अजित पवार यांच्या मृत्यूच्या काळात वापरलेले इतर चार फोनही त्याने नंतर पुन्हा कधीच वापरले नाहीत. आपला फोन तपास यंत्रणांच्या सर्व्हिलन्सवर (पाळतीवर) असल्याच्या भीतीनेच खरातने अशा प्रकारे सतत हँडसेट बदलले असावेत, असा गंभीर संशय अंजली दमानिया यांनी वर्तवला आहे. अंजली दमानिया यांनी केलेल्या दाव्यानुसार, 31 जानेवारीला अशोक खरात नाशिकहून दिल्लीला गेला आणि त्याने विमानतळावरच आपला मोबाईल बदलल्याची अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, 28 जानेवारीला म्हणजेच अजित पवार यांच्या मृत्यूच्या दिवशीच त्याने फोनचा सर्वाधिक वापर केल्याचेही उघड झाले आहे. या संशयास्पद हालचालींमुळे अजित पवार यांच्या मृत्यूशी खरातचा थेट संबंध असल्याची शक्यता अजिबात नाकारता येत नाही. त्यामुळे खरातने बदललेले ते चारही मोबाईल हँडसेट पोलिसांनी जप्त केले आहेत की नाही याची खातरजमा करून ते तातडीने फॉरेन्सिक लॅबकडे तपासासाठी पाठवावेत आणि पोलीस यंत्रणेने या संपूर्ण प्रकरणाची अत्यंत कसून चौकशी करावी, अशी आग्रही मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे.

### CBI कडे हा तपास देणे गरजेचे- रोहित पवार

अजितदादांच्या अपघात प्रकरणात भोंदू खरातचे कनेक्शन समोर येत असून, 'त्या' सहा दिवसांत खरातने चार फोन बदलले, तर एक फोन केवळ 19 मिनिटांचा कॉल करून बदलला. खरातच्या फोनवर सर्वाधिक कॉल अजितदादांच्या अपघाताच्या दिवशी झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. अजितदादांचे अपघात प्रकरण अतिशय भयानक असून, या प्रकरणात CID कडे माहिती देऊनही कारवाई होत नाही. त्यामुळे तात्काळ CBI कडे हा तपास देणे गरजेचे आहे. सीबीआयकडे तपास देण्यासंदर्भात सरकार त्वरित कार्यवाही करेल, ही अपेक्षा आहे. सरकारने आता जास्त उशीर करायला नको, अन्यथा हे संशयाचं धुकं अधिक गडद होईलच, शिवाय गुन्हेगार पुरावे सुद्धा दडपतील.

### ढिंग-टांग




## बारावीला ४५-४० टक्के असणाऱ्यांना CET मध्ये १०० पर्सेंटाईल कसे?

# NEET सारखाच घोटाळा MH-CET परीक्षेतही!

### सचिन सावंतांचा सवाल

**मुंबई (दै. संध्या)**



नीट सारखाचा गडबड घोटाळा MH – CET परिक्षेतही झाल्याचा सनसनाटी आरोप काँग्रेसचे नेते सचिन सावंत यांनी केला आहे. नीट परीक्षेच्या पेपर लिक प्रकरणात महाराष्ट्रासह देशभरात सीबीआयकडून कारवाई केली जात आहे. या पार्श्वभूमीवर सचिन सावंत यांनी पत्रकार परिषद घेत आणखी एक गंभीर गौप्यस्फोट केला आहे.

सचिन सावंत म्हणाले, देशभरात नीट पेपरफुटीने विद्यार्थी आणि पालकांची चिंता वाढली आहे. आयुष्याचा महत्त्वाच्या टप्प्यावर जर तरुण पिढीला फसवले जात असेल तर ही देशाची सुद्धा फसवणूक आहे. नीट पेपरफुटीची चौकशी सुरू असली तरी अशा प्रकारच्या चौकशीतून पुढे काहीही निष्पन्न होत नाही, हा आजवरचा अनुभव आहे. तसेच नीट सारखाच गडबड घोटाळा MH-CET परीक्षेतही झाला आहे. दहावी बारावीला जेमतेम 35-40 टक्के पडलेल्या विद्यार्थ्यांना MH-CET परीक्षेत 100 पर्सेंटाईल पडलेले आहेत, हा घोटाळा असून त्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करा, अशी मागणी सावंत यांनी केली आहे. पुढे बोलताना सचिन सावंत म्हणाले, MH-CET परीक्षेचा अभ्यासक्रम हा 11-12 वीचा असतो, 10 वी 12 परीक्षेत जेमतेम मार्क्स मिळवलेल्या 22 विद्यार्थ्यांना MH-CET परीक्षेत मात्र 100 पर्सेंटाईल मिळालेले आहेत. ज्या विद्यार्थ्याला 10 वीच्या परीक्षेत 37 टक्के मार्क्स मिळाले त्याला MH-CET मध्ये 99.971 टक्के पर्सेंटाईल मिळाले आहेत. बारावीत ज्यांना 51 टक्के मार्क्स मिळाले अशा दोन विद्यार्थ्यांना MH-CET मध्ये 100 पर्सेंटाईल, 45 टक्के मार्क्स पडलेल्याला 100 पर्सेंटाईल आणि 39 टक्के मार्क्स पडलेल्या विद्यार्थ्याला 100 पर्सेंटाईल पडलेले आहेत. बारावीला ज्या विद्यार्थ्याला 35 मार्क्स पडले त्यालाही 100 पर्सेंटाईल पडले आहेत. MHT-CET गणितात 100 पर्सेंटाइल मिळवलेल्या रँक 1, 2, 3, 4, 5, 6, 15, 16, 17 आणि 18 या सर्व विद्यार्थ्यांचे HSC गणितातील सरासरी गुण फक्त 64.3% होते. या राज्यातील दहा अव्वल विद्यार्थ्यांपैकी सहा जणांचे गुण या सरासरीपेक्षाही कमी होते, त्यांचे HSC गणितातील गुण अनुक्रमे 60, 54, 53, 53, 40 आणि 35 होते. CET मधील टॉप 20 रँकर्सपैकी 6 विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेत 60% पेक्षाही कमी गुण मिळाले. रँक 1, 2, 5, 12, 15 आणि 18 - ज्यांचे CET पर्सेंटाइल 99.99 किंवा त्यापेक्षा जास्त आहे - यांना HSC PCM मध्ये 60% पेक्षा कमी गुण मिळाले. MH – CET परिक्षेवर नियंत्रण कोणाचे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकात पाटील यांनी उत्तर द्यावे? अशी मागणी सावंत यांनी केली आहे. तसेच तसेच या परिक्षा कोण नियंत्रित करतो, या परिक्षांवर जोशी नामक व्यक्तीचा काय संबंध आहे, याचाही खुलासा केला पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, CET गणितात 100 पर्सेंटाइल मिळवून राज्यातील टॉप 20 मध्ये स्थान मिळवणाऱ्या एका गुणवंत विद्यार्थ्याला बारावी बोर्डाच्या पीसीएम (PCM) ग्रुपमध्ये अवघे 39 टक्के गुण मिळाल्याचे उघड झाले आहे. इतकेच नव्हे, तर सीईटी गणितात परफेक्ट 100 पर्सेंटाइल मिळवणाऱ्या टॉप 20 मधील तब्बल 10 विद्यार्थ्यांच्या बारावी गणितातील गुणांमध्ये 35 ते 97 अशी तब्बल 62 गुणांची प्रचंड तफावत पाहायला मिळत आहे. यामध्ये एका विद्यार्थ्याला सीईटी गणितात पूर्ण 100 पर्सेंटाइल असूनही बारावी गणितात केवळ 35 टक्के गुण मिळाल्याने दोन्ही परीक्षांच्या गुणांमधील हे 65 गुणांचे मोठे अंतर सध्या शिक्षण क्षेत्रात आश्चर्य आणि तीव्र चर्चेचा विषय ठरत आहे.



# राज्यपाल यांच्या हस्ते कारागिरांचा सन्मान

**मुंबई (दै. संध्या)**

लोक भवन येथे आयोजित विशेष सोहळ्यात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते लिडकॉमच्या कारागिरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राज्यपालांच्या पत्नी सुधा देव वर्मा उपस्थित होत्या. जागतिक फॅशन ब्रँड प्राडाच्या सहकार्याने महाराष्ट्राच्या पारंपरिक कोल्हापुरी चप्पल कलेला जागतिक स्तरावर पोहोचविण्यात लिडकॉमने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच राज्यातील पिढ्यानपिढ्यांचा वारसा जपणाऱ्या कारागिरांसाठी नवीन रोजगार आणि जागतिक बाजारपेठेतील संधी उपलब्ध करून दिली आहे. या सत्कारप्रसंगी कारागीर प्रतिनिधी सौरभ पवार, सतीश सातपुते, विजय शिंदे, तानाजी कांबळे, संभाजी सातपुते, अनिता लोकरे, अरुण चापके, सुरेश आवळे, संदीप रोटे आणि अनिल पवार यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार, मुख्य वित्त अधिकारी आनंद ऐनवाड, कारखाना व्यवस्थापक अमोल शिंदे, विक्री सल्लागार वैभव खाटे आणि जिल्हा व्यवस्थापक एन. एम. पवार यांचाही गौरव करण्यात आला.

प्राडासोबतचे हे सहकार्य लिडकॉम टीम आणि कारागिरांच्या समन्वित प्रयत्नांमुळे शक्य झाले आहे. 'प्राडा मेड इन इंडिया इन्स्पायर्ड बाय कोल्हापुरी चपला' या विशेष प्रकल्पांतर्गत प्राडाने कोल्हापुरी चपलांपासून सँडल्सचा संग्रह जगभरातील ४० निवडक स्टोअर्स आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध केला आहे. या सँडल्सची निर्मिती महाराष्ट्र आणि कर्नाटकातील कारागिरांकडून भारतातच केली जात आहे. तसेच प्राडा संस्थेमार्फत नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी एनआयएफटी आणि कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ लेदर टेक्नॉलॉजी (केआयएलटी) येथे १८० कोल्हापुरी कारागिरांसाठी तीन वर्षांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाला पूर्ण आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या सन्मानामुळे महाराष्ट्र पारंपरिक कारागिरांचा वारसा जपणारे आणि त्यांना जागतिक स्तरावर प्रोत्साहन देणारे राज्य म्हणून अधिक सक्षमपणे समोर आले आहे.

## संपादकीय

# एकाकी इराणला भारताचा आधार!

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या मोठ्या रंगमंचावर, एखाद्या देशाचे कौतुक करणे ही राजनैतिक व्यवहारातील सर्वात स्वस्त गोष्ट असते. पण, त्यानंतर त्या देशाला पूर्णपणे बाजूला सारले जाते. गेल्या आठवड्यात नवी दिल्ली येथे झालेल्या ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत याचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले. भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीचा उद्देश जागतिक ऊर्जा बाजाराला हादरे देणाऱ्या इराण-अमेरिका संघर्षाबाबत एकत्रित भूमिका तयार करणे हा होता. पण, या बैठकीचा शेवट संयुक्त निवेदनाने झाला नाही. भारताचे सर्वात विश्वासू धोरणात्मक भागीदार असल्याचा दावा करणाऱ्या इराण आणि रशिया या दोन देशांनी दुटप्पी राजकारणाचे उघड प्रदर्शन केले. शांतता निर्माण करणारा, देशांना जोडणारा आणि अत्यंत महत्त्वाचा मध्यस्थ म्हणून त्यांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी भारताचे कौतुक केले, पण त्यांच्या कृतींनी प्रत्यक्षात वेगळेच चित्र रंगवले होते. भारताला जाणीवपूर्वक दूर ठेवण्याचाच हा प्रकार होता. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी ब्रिक्स सदस्य राष्ट्रांनी 'आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उल्लंघनाविरुद्ध आणि पाश्चिमात्य वर्चस्वाविरुद्ध' एकत्र यावे, असे आवाहन केले. अमेरिकन-इस्रायली आक्रमणाचा स्पष्ट निषेध करण्याच्या इराणच्या आग्रहामुळे ही परिषद फुटली आणि निष्फळ ठरली. मात्र, या मतभेदांच्या वातावरणातही अराघची यांनी भारताचे भरभरून कौतुक केले. त्यांनी जाहीरपणे म्हटले की, पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित करण्यात भारत अधिक मोठी भूमिका बजावू शकतो. शब्द अतिशय उबदार, नम्र आणि उत्स्फूर्त वाटत होते, पण ते पूर्णपणे पोकळही होते.

रशियाचे सर्गेई लावरोव्ह यांनी हाच खेळ अधिक नेमकेपणाने खेळला. अमेरिका-इराण चर्चांमध्ये सध्या पाकिस्तान निभावत असलेल्या भूमिकेची तुलना त्यांनी भारताच्या अधिक व्यापक आणि दीर्घकालीन मध्यस्थी क्षमतेशी केली. इराण आणि त्याच्या अरब मित्रांना दीर्घकालीन मध्यस्थ हवा असेल, तर भारतच ही भूमिका निभावू शकतो, असे ते म्हणाले. हे केवळ औपचारिक सौजन्य नव्हते, ती अतिशय विचारपूर्वक, मोजून-मापून केलेली स्तुती होती, नेमकी, पण निष्प्रभ!

कारण या दोन्ही देशांनी आधीच आपली निवड करून ठेवली होती आणि त्या निवडीत भारत ठळकपणे अनुपस्थित होता. अमेरिका-इस्रायल-इराण संघर्षाच्या प्रत्येक टप्प्यावर भारताने हस्तक्षेपाची तयारी दर्शवली होती. सर्व पक्षांशी संवाद साधू शकणारी शक्ती म्हणून भारताने मध्यस्थीची ऑफर स्पष्टपणे, वारंवार आणि कोणतीही अट न घालता दिली. मात्र, त्याचा स्वीकार न करता तेहराननने इस्लामाबादकडे धाव घेतली. पाकिस्तानच्या मध्यस्थीतून एप्रिल २०२६ चा युद्धविराम आराखडा तयार झाला. अमेरिका-इराण चर्चा इस्लामाबादमध्ये पार पडल्या. भारतामध्ये यावर तीव्र आणि कठोर प्रतिक्रिया उमटली. विश्लेषक आणि विरोधी पक्षातील नेत्यांचा प्रश्न होता - भारताला या महत्त्वाच्या चर्चेतून दूर का ठेवण्यात आले?, चर्चेसाठी इस्लामाबादची निवड झाल्याने हा अपमान अधिक गडद झाला. संदेश स्पष्ट होता : तात्कालिक सोयीनं सामरिक भागीदारीवर मात केली होती आणि भारताला प्रेक्षकगृहात बसून पाहत राहण्याची वेळ आली होती. याशिवाय, होर्मूझ सामुद्रधुनीत इराणने घातलेल्या व्यापक निर्बंधांमुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या गणितांवर गंभीर परिणाम झाला; इतर अनेक देशांना मात्र अशा अडचणींना फारसे सामोरे जावे लागले नाही. इराणचा सर्वात ठाम राजकीय आणि लष्करी पाठीराखा असलेल्या रशियाचाही यात तितकाच दोष आहे. जर लावरोव्ह यांना खरोखरच भारत हा आदर्श दीर्घकालीन मध्यस्थ वाटत असता, तर त्यांनी इराणवर दबाव आणण्यासाठी सर्व साधने वापरली असती. पण, तसे झाले नाही. भारताच्या सहभागासाठी त्यांनी आग्रह धरला नाही. ही अनवधानाने झालेली चूक नव्हती. ते मुद्दाम उचललेले पाऊल होते. मात्र आता हिशेब चुकता होण्याची वेळ जवळ आली आहे. त्याची पहिली झळ इस्लामाबादलाच बसणार आहे. पाकिस्तानची मध्यस्थी मोहीम स्वमर्यादांच्या ओझ्याखाली कोसळली आहे. अंतर्गत दबाव, आर्थिक एकाकीपणा आणि राजनैतिक थकवा यामध्ये इराणला आता एक साधे पण अस्वस्थ करणारे सत्य स्वीकारावे लागेल.

## संस्कृत सुभाषित

चित्ती क्षमा असावी, जेव्हा येते घरास संपत्ती
धैर्य धरावे, आली दैवाने आपणा जरी विपत्ती।।

अर्थ – या आर्येतही जीवनाचा हाच सिद्धांत सांगितला आहे. म्हणजे केवळ ही उच्च तत्वे वंदनीयच आहेत म्हणून ती श्रेष्ठ आहेत असे नव्हे, तर त्यांच्या योगाने आपले इहलौकिक जीवनही संपन्न, अर्थपूर्ण व यशस्वी होईल असा अर्थ आहे.

## गुरु वचन

### जीवनाचे सार – चार गोष्टी

जगातल्या प्रत्येक अडचणीची उकल शक्य आहे. मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे सातत्य, निष्ठा व प्रयत्न करण्याची क्षमता असेल तर त्यासाठी सर्व सोपे आहे. जीवनाला निरुपयोगातून उपयोगी बनवण्यासाठी अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्यांचा जीवनात समावेश केल्याने अडचणींचे समाधान होऊ शकते. या चार गोष्टींना जीवनाचे सार किंवा आधार सुद्धा म्हटले जाऊ शकते. सर्व प्रकारच्या विकारांचा त्याग, मिथ्यत्व सोडून साधेपणा ग्रहण करणे आहे, बंधने झुगारुन साहस व जीवनात अध्यात्माचा समावेश केला तर मनुष्याचे निरुपयोगी जीवन उपयोगी बनेल. त्याच्या जीवनात असंतोषाचा नाश होईल. त्याबदल्यात त्याच्या जीवनात आनंद, उत्साह, शांतता व समाधानाची वृद्धी होईल.

विकार मानवी जीवनातील सर्वात मोठा अडसर आहे. जो मानवास फक्त विकृती देतो तसेच उदारता, दान, दया, प्रेम या प्रवृत्तींना वंचित करतो. म्हणून त्याच्या भौतिक इच्छा इतक्या बळावतात की, संग्रह करणे मग ते योग्य–अयोग्य, कर्तव्य–अकर्तव्य, नातेवाईक–त्रयस्त, शोषण–पोषण याचा अजिबात विचार करत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, मर्यादा व धोरणे क्षुल्लक वाटू लागतात. अशाप्रकारे विकारांनी पिडीत मनुष्याच्या जीवनात शोक–संताप व अशांतता, असंतोषाशिवाय कुणाला आनंदाची संधी मिळू शकते? विकृती मनुष्याचा फार मोठा दोष आहे, याचा तात्काळ त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मनुष्याचे दोन दागिने मानले गेले आहेत. उदारतेचा गुण आपल्यातील इतर गुण त्यागण्यास प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्ये पेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह धोरण व आदर्शा व्यतिरिक्त करत नाही. उदारता पुरुष मोक्षासाठी अंगीकारतो. उदार पुरुष धोरणाने मिळवलेल्या धन–धान्याने सुखी व समाधानी राहतो. अशा लोकांची प्रत्येक अडचण आपोआप सुटत राहते.

## उपदेशकथा

एकदा वासुदेवानंद सरस्वती एका गावी गेले होते. गावातील एका सात्त्विक बाईने त्यांना विनंती केली की, 'महाराज, आज आपण आमच्या घरी यावे. 'स्वामी तिच्या घरी गेले. बरोबर आलेल्या लोकांशी संभाषण चालले होते. स्वयंपाकघरामध्ये त्या बाईने दूध गरम केले व एका चांदीच्या फूलपात्रामध्ये ओतले. दूध ओतताना त्यावरील साय भांड्यामध्ये पडली. त्याबरोबर तिच्या तोंडून 'अरेरे!' असे शब्द बाहेर पडले परंतु तिने त्यात साखर घातली आणि ते भांडे स्वामींसमोर आणून ठेवले. बराच वेळ झाला तरी स्वामीं दूध प्यायले नाहीत. बाईला वाटले की, दूध गरम असेल म्हणून स्वामींनी ते घेतले नाही पण संभाषण संपले आणि स्वामी परत जायला निघाले तेव्हा बाई म्हणाली, 'महाराज, आपण दूध का घेतले नाही.' स्वामी म्हणाले, 'नाही, मी ते पिऊ शकत नाही, कारण त्यामध्ये साय व साखर आहेच पण त्याबरोबर आणखी काही तरी मिसळले आहे.' बाई म्हणाली, 'छे, नाही महाराज. आणखी काही मिसळले नाही' तेव्हा स्वामी म्हणाले, 'त्यामध्ये अरेरे मिसळले आहे. ते दूध कसे घेऊ?'

कथा उपदेश : साधु पुरुषांना माणसाची शुद्ध अशुद्ध भावना बरोबर कळते. तिला अनुसरून त्यांचे प्रत्यक्ष वर्तन घडते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:आर्द्रा ०६:११:३७ |
| २० मे २०२६ | नक्षत्र:पुनर्वसु |
| बुधवार | २८:११:५२+ |
| विक्रम संवत्– २०८२ | योग:शूल १४:०९:२९ |
| अधिक ज्येष्ठ शके | करण:विष्टि ११:०७:०० |
| संवत्– १९४८ | करण:बव २१:४२:३२ |
| संवत्सर – पराभवनाम | सूर्य:वृषभ |
| अयन– दक्षिणायण | चन्द्र:कर्क२२:३८:३४ |
| मास– अधिक ज्येष्ठ | हिजरी सन् – १४४६ |
| ऋतु – सौर ग्रीष्म | मुस्लिम मास – जिल्हेज |
| शुक्ल पक्ष | तारीख – ३ |
| तिथि:चतुर्थी ११:०७:०० | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९५४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 9 | 1 | | 5 | | | |
| 2 | 5 | | | | | | | |
| | 6 | 8 | | | 3 | 1 | | 5 |
| 8 | 9 | | | | | 2 | 4 | |
| 1 | 2 | | 9 | 4 | 7 | | 5 | 3 |
| | 4 | 5 | | | | | 6 | 7 |
| 6 | | 3 | 8 | | | 7 | 2 | |
| | | | | | | | 8 | 4 |
| | | | 7 | | 2 | 3 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९५३ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 4 | 7 | 5 | 6 | 1 | 8 | 9 | 2 |
| 6 | 8 | 2 | 7 | 9 | 4 | 3 | 1 | 5 |
| 5 | 1 | 9 | 8 | 3 | 2 | 7 | 6 | 4 |
| 4 | 2 | 6 | 3 | 1 | 8 | 9 | 5 | 7 |
| 7 | 3 | 8 | 9 | 2 | 5 | 1 | 4 | 6 |
| 1 | 9 | 5 | 4 | 7 | 6 | 2 | 3 | 8 |
| 2 | 5 | 4 | 1 | 8 | 3 | 6 | 7 | 9 |
| 8 | 7 | 1 | 6 | 4 | 9 | 5 | 2 | 3 |
| 9 | 6 | 3 | 2 | 5 | 7 | 4 | 8 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- २००६ – बगदादमधील स्फोटात १९ जण ठार झाले व ३६ जण जखमी झाले.
- २००८ – मा यिंग यांची तायवानच्या राष्ट्राध्यक्षपदी निवड करण्यात आली.

### राष्ट्रीय

- २००६ – कोकणात वऱ्हाडाचा ट्रक दरीत कोसळून ३२ ठार जण ठार झाले व ५० जण जखमी झाले.
- २००७ – औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि जिल्हा देखरेख सहकारी संघ या दोन संस्थांमध्ये नोकर भरती घोटाळा प्रकरणी तात्कालीन चेअरमन माजी खासदार रामकृष्ण बाबा पाटील, माजी आ. नितीन सुरेश पाटील यांच्यासह बारा जणांना ॲण्टी करप्शन विभागाने अटक केली.

### जन्म

- १८५० – आधुनिक मराठी गद्याचे जनक श्रेष्ठ ग्रंथकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म

### निधन

- १९३२ – भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील बंगाली नेते बिपिनचंद्र पाल यांचे निधन.
- १९९४ – महाराष्ट्राचे माजी राज्यपाल कासू ब्रह्माणंद रेड्डी यांचे निधन.
- २००० – प्रसिद्ध उद्योगपती एस. पी. गोदरेज यांचे निधन.
- २००६ – तामिळनाडूचे मंत्री पलानिवेल राजन यांचे निधन.
- २००६ – तृणमूल काँग्रेसचे आमदार भूपेन्द्रनाथ सेठ यांचे निधन.
- २००६ – 'डाबर'चे मालक रतन बर्मन यांचे निधन.

## : SMS :

Bhakt Swami se:
Swami Ji mera Puja Mein Mann Nahin Lagta Kya Karu??
Swami: Uss Puja Ko Mere Paas Bhejo, Shayad Mra Mann Lag Jaaye.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४०.१ | २८.३ |
| अहमदनगर | ४० | २६.८ |
| अकोला | ४४.५ | ३२.१ |
| अमरावती | ४३.५ | ३१.३ |
| बीड | ४७.८ | ३७.१ |
| भंडारा | ४६.५ | ३४.५ |
| बुलढाणा | ४२.६ | २६.३ |
| चंद्रपूर | ४८.२ | ३७ |
| चेन्नई | ४४ | ३४.१ |
| नवी दिल्ली | ४४.३ | २८.९ |
| धुळे | ४३.९ | ३१ |
| गोंदिया | ४४.८ | ३३.५ |
| जळगाव | ४४.७ | ३२.४ |
| कोल्हापूर | ४० | २६ |
| लातूर | ४१.४ | ३१.६ |
| मुंबई | ४०.७ | ३५.४ |
| नागपूर | ४५ | ३५.४ |
| नांदेड | ४४ | ३३.६ |
| नंदूरबार | ४१.१ | ३० |
| नाशिक | ३९.८ | २५.५ |
| पुणे | ३७.५ | २३.५ |
| पंढरपूर | ४३.५ | ३२.४ |
| सातारा | ३९.७ | २४.९ |
| सांगली | ४१.७ | २६.१ |
| सोलापूर | ४४.२ | ३२.६ |
| वर्धा | ४५.५ | ३६.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पिवळा, योग्य दिशा : उत्तर
आत्मविश्वास तसेच धैर्यपूर्वक पुढे जावे. यश आवश्य मिळेल.

**तूळ :** शुभ रंग : काळा, योग्य दिशा : उत्तर
योग्य मार्गदर्शन घ्यावे लागेल. कामकाजातील जिज्ञासा वाढेल.

**वृषभ :** शुभ रंग : काळा, योग्य दिशा : पूर्व
बुद्धिचातुर्याच्या जोरावर कार्यक्षेत्रात यश मिळेल. नव्या योजनांची शक्यता आहे. अधिक लोभ, लालच करु नका.

**वृश्चिक :** शुभ रंग : लाल, योग्य दिशा : पूर्व
आपला व्यवहार आणि कार्यकुशलतेनी अधिकारी वर्गाला फायदा मिळेल.

**मिथून :** शुभ रंग : काळा, योग्य दिशा : उत्तर
सामाजिक स्तरातील परिवर्तन आणि प्रतिष्ठेच्या बाबतीत चिंतीत रहाल. मानसिक अस्थिरता राहिल.

**धनू :** शुभ रंग : गुलाबी, योग्य दिशा : पश्चिम
आर्थिक कामात इच्छित प्रगति न होण्याने मानसिक अशांतता राहिल. शत्रूच्या संख्येत वाढ होईल.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, योग्य दिशा : पूर्व
स्वाध्यायात आवड वाढेल. आपली दुरदर्शीता आणि बुद्धिमत्तेनी काही रखडलेली कामे पूर्ण होतील.

**मकर :** शुभ रंग : निळा, योग्य दिशा : पूर्व
शुभ कार्यात सामिल होण्याने यश आणि मान सन्मान मिळू शकेल. लाभ अधिक प्रमाणात मिळेल.


**सिंह :** शुभ रंग : पांढरा, योग्य दिशा : पश्चिम
कार्यकुशलता आणि कार्यक्षमता वाढेल. आपसातील विचार विमर्श लाभदायक ठरतील.

**कुंभ :** शुभ रंग : पांढरा, योग्य दिशा : उत्तर
व्यवहार चातुर्य आणि सहनशिलतेमुळे येणाऱ्या संकटातुन सुटका होईल. आपल्या कामाशी काम ठेवा.

**कन्या :** शुभ रंग : हिरवा, योग्य दिशा : पश्चिम
खरेदीचा योग राहिल. व्यापारात लाभ मिळेल. आपली स्थिती, योजनेच्या अनुरुप काम करा.

**मीन :** शुभ रंग : हिरवा, योग्य दिशा : पश्चिम
वेळेचा लाभ जास्तीत जास्त घ्यायला हवा. व्यापारात प्रगतिचे योग आहेत.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९५४



**आडवे शब्द**
१. एका चांगल्या गोष्टीत दुसऱ्या चांगल्या गोष्टीची भर पडणे (वाक्य प्रचार)
७. बोचरे दु:ख
८. दु:ख
१०. दोरीने उघडझाप होणारी छोटी पिशवी
११. खंदक, मोठा लांब खड्डा
१२. दरवाजा
१३. चुकीचे
१५. पाप
१७. भोळा, निरागस
१८. रमापती
१९. च्या मराठी
२१. हत्तीचे ओरडणे
२२. वाळवी, उणीव
२३. नम्रता
२५. वडील
२६. कार्यक्षम आणि प्रसंगावधानी
२८. माया, प्रेम
३०. कडाक्याचे भांडण
३२. दुधाचे दही बनविणारा घटक
३५. घोड्याला मालिश
३७. घराचे पुढील दार
३९. यापेक्षाही फळाच्या फोडी करून खाणे चांगले
४०. आणीबाणीत बदनाम झालेला कायदा, त्याची आठवण म्हणून लालूप्रसाद यांनी ठेवलेले नाव
४२. हळू, संथपणे
४४. खरे बोलणारा, वचन पाळणारा
४७. डोंगराची उतरण
४९. पंख
५०. रचलेले कारस्थान
५१. पडणे, ५४. कुत्रा
५५. पायजमा, तुमान
५६. मार्गक्रमण
५७. पाठविलेला
६०. घागरा
६३. तरुण व बळकट
६६. मार्ग, रस्ता
६७. तात्पर्य, सारांश
६८. वृद्धत्व, थोडे
७०. सततची हालचाल
७२. अरण्य
७३. जैन साधू
७५. दागिना किंवा वाद्य
७६. गीत, नृत्य, वादन इ. कला
७८. निर्धन व्यक्ती
८१. फुलांची टोपली
८२. वेदनेची तिडीक
८३. कार्य, काज
८४. तृण

**उभे शब्द**
१. मिळण्यास अशक्य, अवघड
२. पूजा साहित्याचे ताट
३. आंब्याची पोळी
४. खांदा, खांद्याचे हाड
५. बेचव, रुचीहीन
६. भीती
७. कुंपणापर्यंतच धाव असणारा प्राणी
९. उत्सव, नवा जोम
१२. दडपण
१३. एखाद्याबद्दल झालेला चुकीचा ग्रह
१४. लक्ष्मीनारायण
१६. छोटा तवा
१७. हिंदुस्थान
२०. जाड्याभरड्या सुताचे कापड
२४. नट्टापट्टा
२५. बळ, शक्ती
२७. रविवार
२९. महिरप
३१. मालक, स्वामी, पोशिंदा
३३. काढलेली सुट्टी
३४. विमान
३६. मध्यम प्रतीचा
३८. पत्थर
४०. कलाकुसरीच्या वस्तूंची बजारपेठ, दिल्लीची 'तुळशीबाग'
४१. एकाच छापाच्या वस्तू तयार करण्याचे साधन
४२. सर्प
४३. नवरदेव
४५. मालाची विक्री
४६. रात्रीचा पाऊस, एक पक्षी
४८. चूक
५०. जनावरांचा घोळका
५२. नृत्यकलेचे दैवत
५३. जमा करण्याची रक्कम इ.
५५. भयंकर (हास्य)
५८. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
५९. खोडसाळ, दुष्ट, खट्याळ
६१. पाठवणी
६२. नदीवरील बांध
६४. भटक्या, एका जागी स्थिर न राहणारा माणूस
६५. दाहक, तीव्र
६७. सुट्टीतील एक बैठा खेळ
६९. लालूप्रसाद यादव यांच्या पक्षाची आद्याक्षरे
७१. व्रत
७२. पालवीचा ऋतू
७४. सोने
७७. बारा वर्षांचा काळ
७९. आग्रह, भीड
८०. चौक

**जम्बो शब्दकोडे क्र. ९५२ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.देवदासी ४.पोळ पाटलाटणे ८.बखेडा ९.शर १०.तापट १२.तरट १३.नर १४.मनोहर १५.ओळ १६.तारकाबारका १८.पुणे १९.रतन २१.सडक २३.रद २४.घण २५.रबर २७.हापसा २९.भजी ३०.तयार ३२.माळ ३३.वणी ३४.वसा ३५.नत ३६.कल्हई ३७.गार ३८.पंधरवडा ४०.नारळ ४३.चेटूक ४४.वार ४७.मावसभाऊ ४९.जनन ५०अ.रण ५१.वळ ५२.रासगरबा ५५मणेर ५७.कवन ५८.पार ५९.ईश्वर ६०.यजमान ६२.रमणीय ६३.गगन ६४.तारतम्य ६५.जग ६७.सरळ ६९.दिवस ७०.मुरमाड ७२.पसा ७३.काव ७४.पुरावा ७५.दशा ७७.कळक ७८.सर्वत्र ७९.रसवान ८०.शबरी

उभे उत्तर : १.देश २.वरमणे ३.सीताहरण ४.पोट ५.पातळसर ६.टर ७.लाट ८.बरबाद ११.परत १३.नकार १७.काळवीट १८.पुरातन २०.नरमाई २२.कहाणी २४.घर २६.बळ २८.सावध ३०.यातना ३१.वरचेवर ३४.सारवान ३४अ.सडा ३६.कळवळणे ३८.पंकज ३९.वर ४१.रमा ४२.पाऊस ४५.जाणकार ४६.नवलाई ४८.भारा ५०.नयनरम्य ५३.गमन ५४.बाकदार ५५.मरगळ ५६.रयनदिवस ५८.पयजमा ६१.मानसपुत्र ६४.तालेवार ६६.गडकरी ६७.सपाक ६८.रसाळ ७१.रमेश ७५.दवा ७६.शान

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### माननीय महापौर मंजुषाताई नागपुरे यांचा साधेपणात वाढदिवस साजरा

पुणे (दैनिक संध्या) : आजच्या काळात वाढदिवस म्हटला की मोठे बॅनर्स, ढोल-ताशे, फटाके आणि दिखाऊ कार्यक्रम यांचे चित्र पाहायला मिळते. मात्र माननीय महापौर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त अत्यंत साधेपणाने आणि सामाजिक जाणीव जपत एक वेगळा आदर्श समाजासमोर ठेवला. कोणत्याही प्रकारचा गाजावाजा, बॅनरबाजी किंवा ढोल-ताशांचा वापर न करता त्यांनी SOFOSH(Society of Friends of The Sassoon Hospital) या संस्थेला भेट दिली. संस्थेतील मुलांबरोबर वेळ घालवत त्यांच्या भावना जाणून घेतल्या तसेच त्यांच्यासोबत शांत आणि आपुलकीच्या वातावरणात वाढदिवस साजरा केला. या प्रसंगी मुलांशी संवाद साधत त्यांना प्रोत्साहन दिले व समाजातील प्रत्येक घटकाप्रती आपली जबाबदारी ओळखून काम करणे हीच खरी लोकसेवा असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. माननीय महापौरांच्या या साधेपणपूर्ण आणि सामाजिक दायित्व जपणाऱ्या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत असून, समाजासाठी संवेदनशील नेतृत्व कसे असावे याचा आदर्श त्यांनी निर्माण केला आहे.

### "भारत विकास परिषद" तर्फे दिव्यांग व्यक्तींसाठी कृत्रिम पाय मोजमाप शिबिर




पुणे (दैनिक संध्या) : भारत विकास परिषद दक्षिण पुणे व पिंपरी चिंचवड शाखेतर्फे सहकारनगर, पुणे येथील " स्व - आधार" दिव्यांग मदत केंद्रात दिव्यांग बांधवांसाठी, भगींनीसाठी कृत्रिम पाय मोजमाप शिबिर उत्साहात संपन्न झाले. या शिबिरात १७ दिव्यांग बांधवांचे मोजमाप करण्यात आले असून लाभार्थ्यांना अत्याधुनिक लॅमिनेशन तंत्रज्ञानाद्वारे तयार करण्यात येणारे कृत्रिम पाय पूर्णतः मोफत बसवून देण्यात येणार आहेत. या कृत्रिम पायांची बाजारातील किंमत सुमारे रुपये ५० ते रुपये ७० हजार इतकी असून,भारत विकास परिषदे मार्फत सेवाभावी वृत्तीने व सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना,भगिनींना आपल्या दैनंदिन जीवनात अधिक स्वावलंबी व स्वनिर्भर होण्यास मदत होणार असून,त्यांच्या जीवनात नव्या आशा व आत्मविश्वासाची भर पडणार आहे. भारत विकास परिषद दक्षिण पुणे व पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने अशा प्रकारचे शिबीर दर महिन्याला आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.कृत्रिम पाय व इतर सहाय्याबाबत व नाव नोंदणीसाठी इच्छुकांनी संपर्क क्रमांक जयंत जेस्ते ९८२२५१०३४९ या मोबाईलवर संपर्क साधावा, असे आवाहन भारत विकास परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

### श्वास संपण्याआधी इच्छा संपतात ; तीच खरी 'मुक्ती'; स्वानंद पुंड शास्त्री महाराज



पुणे (दैनिक संध्या) : माणूस जन्माला येतो तेव्हा श्वास आणि इच्छा दोन्ही घेऊन येतो. जोपर्यंत श्वास चालू असतो, तोपर्यंत इच्छा देखील अखंड चालू असतात. एकतर श्वासाचे भांडे आधी संपते किंवा इच्छांचे भांडे आधी संपते. श्वास संपण्याआधी इच्छा संपल्या, तर त्याला 'मुक्ती' असे म्हणतात. असा जो असतो, त्याला 'जीवनमुक्त' म्हणतात, असे प्रतिपादन प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी केले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने आयोजित प्रवचनमालेत यवतमाळ वणी येथील प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी श्री गणेश गीतेतील भक्तीयोगावर दुसऱ्या दिवशी निरूपण केले. श्रीमंत थोरले बाजीराव रस्त्यावरील नू.म.वि.प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात ही प्रवचनमाला सुरु आहे. अधिकमासाच्या पावन मुहूर्तावर भगवान श्री गणेशांच्या भक्तीचा मार्ग प्रशस्त करणारा श्री गणेश गीतेतील भक्तीयोग गणेशभक्तांसमोर मांडण्याकरीता प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे. प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज म्हणाले, ज्याला मनावर नियंत्रण ठेवता येते, त्याचेच खरे कौतुक असते. कोणत्याही वाईट गोष्टींना 'हो' म्हणण्यासाठी जितकी ताकद लागत नाही, त्यापेक्षा अधिक ताकद 'नाही' म्हणण्यासाठी लागते. दोष न करण्यासाठीही सामर्थ्य लागते. मनाला जिंकणे अत्यंत कठीण आहे; पण त्याशिवाय दुसरा पर्याय नाही. ते पुढे म्हणाले, जो माझ्याजवळ येतो त्याच्याजवळ मी आदराने जातो, असे मोरया सांगतात. पण आपण मोरयाला बहुतेक वेळा फक्त दुःखातच आठवतो. समस्या आली की मोरया आठवतो; परंतु सुखातही मोरयाची आठवण ठेवली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. दि. २३ मे २०२६ पर्यंत दररोज सायंकाळी ६.३० ते ८ यावेळेत ही प्रवचनमाला होणार आहे. भगवंताच्या भक्तीचे नेमके स्वरूप काय? भगवान कशाला भक्ती म्हणतात? याचे सविस्तर विश्लेषण मांडण्याकरिता आणि अधिकमासाच्या पावन मुहूर्तावर भगवान श्री गणेशांच्या भक्तीचा मार्ग प्रशस्त करणारा श्री गणेश गीतेतील भक्तीयोग गणेशभक्तांसमोर मांडण्याकरीता प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.



### पुण्यात 'द डिस्टिंग्विश्ड जेंटलमन्स राईड'चा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : पुरुषांच्या मानसिक आरोग्याबाबत जागृती निर्माण करणे तसेच प्रोस्टेट कॅन्सर संशोधनासाठी निधी संकलन करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला 'द डिस्टिंग्विश्ड जेंटलमन्स राईड' (DGR) स्नेहमेळावा नुकताच पुण्यात उत्साहात पार पडला. पाषाण येथील ट्रायम्प – बी.यू. भंडारी मोटारसायकल शोरूमपासून सुरू झालेल्या या कार्कार्यक्रमाचा समारोप कल्याणी नगर येथील 'कायरोस रेस्टॉरंट'मध्ये झाला. जगभरात एकाच दिवशी आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमात पुण्यातील तब्बल २८० रायडर्स सहभागी झाले होते. क्लासिक आणि कस्टम मोटारसायकलींसह रायडर्सनी आकर्षक 'डॅपर' पेहरावात सहभाग नोंदवत शहरातील विविध भागांतून एकत्र येत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. पुरुषांच्या आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्याबरोबरच जबाबदार आणि शिस्तबद्ध मोटरसायकलिंगचा संदेशही या राईडमधून देण्यात आला.

# शिष्टमंडळात 'ग्रीनएक्स'च्या आरती भोसले-अहिवळे यांची निवड

**पुणे (दै. संध्या)**



> भारत जगाच्या हरित अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करत असताना, ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल ही संस्था देशातील उद्योगांना जागतिक ईएसजी मानकांशी जोडणारा, परिवर्तनाचा दिशादर्शक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणारा अत्यंत मजबूत पर्यावरणीय नेतृत्वाचा चेहरा म्हणून उदयास येत आहे.
>
> **- आरती भोसले-अहिवळे, संस्थापिका, ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल**

भारत-नॉर्वे ग्रीन स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप समिटमध्ये सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उद्योग प्रतिनिधी मंडळातील टॉप २० प्रतिनिधींमध्ये पुण्यातील ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटलच्या संस्थापक व व्यवस्थापकीय संचालिका आरती भोसले-अहिवळे यांची निवड झाली आहे. ऑस्लो येथे १८ आणि १९ मे रोजी झालेल्या या परिषदेत त्यांनी ईएसजी नेतृत्व आणि शाश्वत विकास या विषयावर भाषण केले. ग्रीनएक्स एन्व्हायर्नमेंटल ही संस्था ईएसजी कन्सल्टिंग, सस्टेनेबिलिटी रिपोर्टिंग, कार्बन फूटप्रिंटिंग, लाइफ सायकल असेसमेंट आणि पर्यावरणीय अनुपालन या क्षेत्रांत कार्यरत आहे. तसेच नॉर्वेतील ईपीडी ग्लोबल या आंतरराष्ट्रीय संस्थेची भारतातील 'लीगल बिझनेस पार्टनर' म्हणूनही संस्था कार्य करते. पर्यावरण, सामाजिक जबाबदारी आणि प्रशासन (ईएसजी), हवामान बदल, हरित औद्योगिक परिवर्तन आणि शाश्वत आर्थिक विकास या विषयांवर या परिषदेत चर्चा झाली. परिषदेला नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गाहर स्टोरे यांच्यासह दोन्ही देशांतील वरिष्ठ अधिकारी आणि उद्योग प्रतिनिधी उपस्थित होते. भारताकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल सहभागी झाले होते. दोन्ही पंतप्रधानांसह आयोजित विशेष मेजवानीसाठीही आरती भोसले निमंत्रित करण्यात आले होते. या परिषदेमध्ये जगभरातील धोरणकर्ते, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, उद्योगजगताचे अग्रणी प्रतिनिधी आणि पर्यावरणीय नेतृत्व करणाऱ्या संस्था एकत्र येऊन भविष्यातील हरित विकासाची दिशा निश्चित करण्यावर चर्चा करतात. या परिषदेमुळे भारत व नॉर्वे यांच्यातील नवीन ऊर्जा, कार्बन न्यूट्रॅलिटी, शाश्वत पुरवठा साखळी, हरित नवोन्मेष व पर्यावरणीय प्रशासन या क्षेत्रांतील सहकार्य अधिक दृढ झाले आहे. भारत–नॉर्वे ग्रीन स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप समिटच्या समारोप प्रसंगी दोन्ही देशांनी हरित तंत्रज्ञान, हवामान कृती आणि शाश्वत विकासासाठी परस्पर सहकार्य अधिक वाढवण्याचा संकल्प पुन्हा एकदा दृढ केला.

ईएसजी नेतृत्व आणि शाश्वत परिवर्तनावर प्रभावी भाषण करताना आरती भोसले-अहिवळे यांनी ईएसजी ही संकल्पना आता जागतिक व्यापार, गुंतवणूक, पुरवठा साखळी आणि आंतरराष्ट्रीय मानकांशी निगडित अत्यावश्यक बाब बनल्याचे नमूद केले. पर्यावरणीय जबाबदारी आणि नैतिक प्रशासन यांवर आधारित विकासालाच भविष्यात अधिक महत्त्व प्राप्त होईल, असे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या टॉप २० उद्योग प्रतिनिधी मंडळात मिळालेली ही निवड म्हणजे ग्रीनएक्सच्या सातत्यपूर्ण कार्याची, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कौशल्याची आणि भारताच्या हरित परिवर्तनात दिलेल्या योगदानाची सर्वोच्च पातळीवरील मान्यता आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

## शिक्षण माफियांविरोधात छावा संघटनेचे तीव्र आंदोलन"

**पुणे (दै. संध्या)**



देशभर गाजत असलेल्या नीट २०२६ परीक्षा पेपरफुटी प्रकरणामुळे पुण्यातही संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित शिक्षण माफिया, एजंट आणि कोचिंग क्लासेसवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात नीट पेपरफुटी प्रकरणी अटक करण्यात आलेले आरसीसी क्लासेसचे संस्थापक अध्यक्ष शिवराज मोटेगावकर तसेच इतर आरोपींच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलकांनी शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात तीव्र संताप व्यक्त करत दोषींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. दरम्यान, अखिल भारतीय छात्र संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मच्छिंद्र चिंचोळे यांनी स्वतःच्या अंगावर डिझेल ओतून घेत आंदोलन अधिक तीव्र केले. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये झटापट झाल्याने काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

## हिंदुस्तान झिंकच्या राजपुरा दरीबा संकुलाला केंद्रीय खाण मंत्र्यांची भेट

**पुणे (दै. संध्या)**



राजस्थानमधील राजपुरा दरीबा संकुलात केंद्रीय कोळसा व खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी भेट देत भूमिगत खाणकाम, धातू निर्मिती प्रक्रिया आणि सामाजिक विकास उपक्रमांचा आढावा घेतला. या दौऱ्यात त्यांनी सिंदेसर खुर्द भूमिगत खाण तसेच दरीबा धातू प्रक्रिया संकुलाची पाहणी केली.

सिंदेसर खुर्द खाण ही अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित भूमिगत खाण मानली जाते. येथे सुरक्षितता, दूरस्थ नियंत्रण प्रणाली आणि आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून खाणकाम केले जाते. मंत्र्यांनी नियंत्रण विभागाला भेट देत प्रत्यक्ष कार्यपद्धतीची माहिती घेतली.

महिला खाण बचाव पथकाचे प्रात्यक्षिक पाहून मंत्र्यांनी महिलांच्या सहभागाचे कौतुक केले. खाण क्षेत्रात सुरक्षितता, कौशल्यविकास आणि सर्वसमावेशकतेला कंपनीने दिलेले प्राधान्य उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

दरीबा धातू प्रक्रिया संकुलामध्ये खाणकामापासून धातू निर्मितीपर्यंतची एकात्मिक प्रक्रिया पाहून मंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. कंपनीत मोठ्या प्रमाणावर महिला कर्मचारी कार्यरत असून विविध क्षेत्रांत त्यांचे नेतृत्व दिसून येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना जी. किशन रेड्डी म्हणाले की, विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करताना देशातील खनिज संपत्ती आणि तंत्रज्ञानाधारित उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतील. स्वावलंबी औद्योगिक व्यवस्था उभारण्यासाठी जबाबदार खाणकाम आणि देशांतर्गत उत्पादन वाढ आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या भेटीदरम्यान महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य सेवा, शुद्ध पिण्याचे पाणी, ग्रामीण क्रीडा आणि युवक प्रशिक्षण यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहितीही मंत्र्यांना देण्यात आली.

## हिंदी जनरल एंटरटेनमेंट वाहिनी क्षेत्रात झी टीव्हीचा दबदबा

**पुणे (दै. संध्या)**



झी टीव्हीने हिंदी जनरल एंटरटेनमेंट वाहिनी (GEC) क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करत ह्या वाहिनीवरील 'वसुधा' आणि 'गंगा माई की बेटियाँ' या दोन मालिकांनी टीव्हीवरील अव्वल रेटिंग मिळवणाऱ्या कार्यक्रमांमध्ये स्थान मिळवले आहे. 'वसुधा' ही मालिका सलग दुसऱ्या आठवड्यात 2.0 टीव्हीआरसह क्रमांक एकवर कायम असून 'गंगा माई की बेटियाँ'ने 1.7 टीव्हीआरसह दमदार कामगिरी करत प्रेक्षकांमध्ये झी टीव्हीच्या कथाकथनाबद्दल वाढत असलेले प्रेम दर्शवले आहे.

दरम्यान, अन्य एका रोमांचक घडामोडीत झी टीव्हीवरील 'तुम से तुम तक' ही मालिका एक भव्य लग्नाच्या भागासाठी सज्ज होत असून त्यामुळे कथानकात आणखी एक नाट्यमय वळण येण्याची शक्यता आहे. प्रेक्षक या कथा आणि व्यक्तिरेखांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतलेले असून आगामी आठवड्यांत टीव्हीच्या रेटिंग्स व प्रेक्षकांच्या पसंतीत आणखी बदल होऊन स्पर्धा अधिक तीव्र होणार आहे.

'वसुधा' मालिकेत मुख्य भूमिका साकारणाऱ्या प्रिया ठाकूरने कृतज्ञता व्यक्त करत सांगितले, "'वसुधा'ला मिळणारे प्रेम आमच्यासाठी खूप खास आहे कारण प्रेक्षकांनी या व्यक्तिरेखांशी आणि त्यांच्या प्रवासाशी मनापासून नाते जोडले आहे. देशभरात 'वसुधा' ही अव्वल रेटिंग मिळवणाऱ्या मालिकांपैकी एक बनली आहे हे पाहणे खरोखरच अविश्वसनीय वाटते. शूटिंगदरम्यान आम्ही दररोज या पात्रांमध्ये स्वतःचा एक भाग ओततो त्यामुळे हे प्रेम खूप वैयक्तिक आणि खास वाटते. प्रेक्षकांनी 'वसुधा'ला इतक्या प्रेमाने आणि आपुलकीने स्वीकारले याबद्दल मी मनापासून आभारी आहे. आम्ही सगळेच या पाठिंब्याबद्दल अत्यंत कृतज्ञ आहोत!"

झी टीव्हीवरील 'गंगा माई की बेटियाँ'मध्ये स्नेहाची भूमिका साकारणाऱ्या अमनदीप सिधूने सांगितले, "पुन्हा एकदा 'गंगा माई की बेटियाँ'ने टीआरपीच्या क्रमवारीत दुसरे स्थान मिळवलेले पाहून खूप आनंद आणि कृतज्ञता वाटत आहे. झी हा ब्रँड प्रेक्षकांकडून इतके प्रेम मिळवत आहे आणि टीआरपीमध्ये अव्वल स्थान पटकावत आहे हे पाहणे खूप खास आहे. कलाकार म्हणून आमचे कष्ट प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहेत यापेक्षा मोठा आनंद आमच्यासाठी काहीच नाही. 'वसुधा'ने पुन्हा एकदा पहिले स्थान मिळवले याचा मला विशेष आनंद आणि अभिमान वाटतो. हे सगळे एका मोठ्या कुटुंबासारखे वाटते आणि आम्ही सगळे मिळून यशाचा हा आनंद साजरा करत आहोत. प्रेक्षकांकडून मिळणारे भरभरून प्रेम आणि मालिकांची दररोज वाढती लोकप्रियता आम्हां सगळ्यांसाठी खूपच खास आणि समाधानकारक आहे. सातत्याने दिलेले प्रेम आणि पाठिंब्यासाठी प्रेक्षकांचे मनापासून आभार."

पहा तुमचे आवडते सर्व कार्यक्रम दररोज फक्त झी टीव्हीवर!

## एमआरपी ग्राहकांच्या आर्थिक शोषणाचे माध्यम

**पुणे (दै. संध्या)**



ग्राहकांकडून वस्तूंवर अवाजवी किंमत आकारली जाऊ नये यासाठी लागू करण्यात आलेली एमआरपी (मॅक्सिमम रिटेल प्राईस) व्यवस्था आज अनेक ठिकाणी ग्राहकांच्या आर्थिक शोषणाचे माध्यम बनत असल्याचा आरोप अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने केला आहे. या विरोधात ग्राहक पंचायतीने देशव्यापी जनजागृती आणि आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनांतर्गत ११ मे ते २५ मे २०२६ दरम्यान देशभर जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून, २५ मे रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे राष्ट्रीय स्तरावरील आंदोलन होणार आहे. तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदने देण्यात येत असून विविध ठिकाणी लोकशाही मार्गाने आंदोलने केली जात आहेत, अशी माहिती ग्राहक पंचायतीचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य सूर्यकांत पाठक यांनी दिली. ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी १९७६ साली एमआरपी कायदा अस्तित्वात आला. या कायद्यानुसार उत्पादकांना उत्पादनांवर कमाल किरकोळ किंमत छापणे बंधनकारक आहे. मात्र, एमआरपी निश्चित करण्यासाठी कोणतेही वैज्ञानिक अथवा स्वतंत्र नियंत्रण नसल्याने उत्पादक कंपन्या उत्पादन खर्चाच्या कितीतरी पटीने जास्त किंमत छापत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# वरंध येथे सिमेंट बंधाऱ्याचे लोकार्पण उत्साहात संपन्न

## सुदर्शन CSR चा जलसंधारणासाठी महत्त्वपूर्ण पुढाकार : वरंध येथे सिमेंट बंधाऱ्याचे उद्‌घाटन

**लोकसहभागातून जलसमृद्धीकडे वाटचाल : वरंध सिमेंट बंधारा ग्रामस्थांना समर्पित**

**पुणे (दै. संध्या)**



महाड तालुक्यातील मौजे वरंध येथे वनराई संस्था, पुणे आणि सुदर्शन सी.एस.आर. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सिमेंट बंधारा कामाचे उद्घाटन व लोकार्पण समारंभ शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

सुदर्शन सी.एस.आर. फाउंडेशन हे सुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रीज लिमिटेड चे सामाजिक उत्तरदायित्व (CSR) विभाग असून, ग्रामीण विकास, जलसंधारण, महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धन या क्षेत्रांत शाश्वत आणि लोककेंद्रित उपक्रम राबवत आहे. ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यासाठी समुदाय सहभागातून दीर्घकालीन विकास घडवून आणण्यावर संस्थेचा विशेष भर आहे.

सदर सिमेंट बंधाऱ्याचे उद्‌घाटन व जलपूजन महाराष्ट्र शासनाचे फलोत्पादन, रोजगार हमी व खारभूमी योजना मंत्री मा. भरतशेठ गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना मंत्री भरतशेठ गोगावले यांनी सुदर्शन सी.एस.आर. फाउंडेशनच्या विविध विकासकामांचे कौतुक केले. "सुदर्शन कंपनी केवळ काम करायचे म्हणून काम करत नाही, तर त्यांनी राबविलेली कामे ही खऱ्या अर्थाने लोकउपयोगी, परिणामकारक आणि शाश्वत स्वरूपाची असतात," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

या कार्यक्रमाला सुदर्शन कंपनीचे ए.व्ही.पी. व प्लांट हेड विवेक गर्ग, ए.व्ही.पी. बी. एन. कदम, तालुका कृषी अधिकारी धीरज तोरणे, सुदर्शन सी.एस.आर. फाउंडेशनच्या माधुरी सणस, वनराई संस्थेचे विश्वस्त सागर धारिया, सचिव अमित वाडेकर, शशांक गराडे, विनायक गारडे तसेच वनराई संस्थेची टीम उपस्थित होती.

तसेच सुदर्शन कंपनीचे अन्सार डांगे (प्लांट हेड, महाड), साईप्रसाद (इंजिनीअरिंग हेड), आप्पासाहेब गजबर (सेफ्टी हेड), विष्णू लहामगे (प्रोडक्शन) आणि विलास भालेराव (आयआर हेड) यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डेमो प्लॉट प्रकल्प यशस्वीरित्या राबविणाऱ्या सहा प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वरंध गावाचे सरपंच जयवंत देशमुख यांनी केले. कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, ग्रामविकास अधिकारी, शेतकरी, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत उभारण्यात आलेला हा सिमेंट बंधारा परिसरातील जलसंधारण, भूजल पातळी वाढ, शेती विकास आणि भविष्यातील जलसुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ‘द पॅव्हेलियन मॉल’ पुणे सादर करीत आहे ‘द लॉस्ट डायमंड’

पुणे (दैनिक संध्या) : यंदाच्या उन्हाळ्यात पुणेकरांसाठी ‘पॅव्हेलियन मॉल’ ने ‘द लॉस्ट डायमंड’ सादर केले आहे जे साहस, उत्साह आणि एका अनोख्या मनोरंजनाने परिपूर्ण आहे. हे धमाकेदार आणि सशुल्क (तिकीट असलेले) उन्हाळी आकर्षण सात जून २०२६पर्यंत मॉलच्या ‘ग्राउंड फ्लोअर एट्रिअम’ येथे सुरू राहणार आहे. या ठिकाणी मॉलचे रूपांतर एका जंगल-थीमवर आधारित खजिना शोध मोहिमेत करण्यात आले असून, यात अनेक संवादात्मक मोहिमा, थीम-आधारित आव्हाने आणि ‘एक्स्प्लोरेशन झोन्स’चा समावेश आहे. ‘वन वे एक्स्पेरिएन्शल जर्नी’ म्हणून डिझाइन केलेले ‘द लॉस्ट डायमंड’ सहभागींना चार रोमांचक मोहिमांवर घेऊन जाते. तिथे त्यांना लपलेला खजिना शोधण्यासाठी साहसी आव्हाने पूर्ण करावी लागतील.

जंगल ड्राइव्ह : या प्रवासाची सुरुवात एका खडतर ‘जंगल ड्राइव्ह’ने होते; जिथे मुले रिमोट-कंट्रोल जीप आणि ट्रक्सच्या मदतीने चिखलाचे रस्ते, लाकडी पूल, खडक आणि विविध अडथळ्यांनी भरलेल्या खडबडीत मार्गांवरून ड्रायव्हिंगचा आनंद घेऊ शकतात.

नदी मोहीम : यानंतर हे साहस नदी मोहीम झोनमध्ये प्रवेश करते; जिथे सहभागींना जंगलातील घटक आणि तरंगत्या अडथळ्यांनी वेढलेल्या, खास तयार केलेल्या पाण्याच्या प्रवाहांतून रिमोट-कंट्रोल बोटी चालवायला मिळतात.

ड्रोन मिशन : पुढे, डोंगर-थीमवर आधारित ड्रोन मिशनचा थरार अनुभवा; जिथे मुले उंचावरील रचना, लटकणारे खडक आणि चेकपॉइंटच्या मार्गांवरून ड्रोन उडवू शकतात.

हिऱ्यांचा शोध : शेवटचा आणि सर्वांत रोमांचक टप्पा म्हणजे हिऱ्यांचा शोध होय. सहभागी झालेले एका खड्ड्यातून लपलेले हिरे, खजिन्याची नाणी आणि रत्ने शोधण्यासाठी उत्खनन (खाणकाम) करू शकतात. हा एकूणच अनुभव लहान मुलांसाठी आणि त्यांच्या कुटुंबासाठी अतिशय गुंतवून ठेवणारा आणि आनंददायी आहे.




### तिघांकडून एकाचा खून; पोलिसांकडून 48 तासांत उलगडा

चाकण : (दैनिक संध्या) : धक्का लागल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एकाचा डोक्यात दगड घालून खून करण्यात आला. चाकण दक्षिण पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत तीन आरोपींना अटक केली. कोणताही ठोस पुरावा नसताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीपर्यंत मजल मारली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाणेकरवाडी येथे गुरुवारी (दि.१४) रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास येथील आयएआय कंपनीच्या मागील रस्त्यावर तीन अनोळखी इसम एका अनोळखी गंभीर जखमी व्यक्तीला खांद्यावर उचलून नेत असल्याचे एका नागरिकाच्या निदर्शनास आले. जखमीच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. घटनास्थळी रक्ताने माखलेला मोठा दगडही आढळून आला. नागरिकाने तातडीने चाकण दक्षिण पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांनी जखमीला तात्काळ चाकण येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी पिंपरी येथील वायसीएम रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असताना शुक्रवारी (दि.१५ ) त्या ओळखी इसमाचा मृत्यू झाला. त्यानंतर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा खुनात रूपांतरित करण्यात आला. मृताची ओळख आणि आरोपींबाबत कोणताही ठोस धागादोरा नसल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. चाकण दक्षिण पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने तांत्रिक तपासाची चक्रे वेगाने फिरवली. चाकण, पिंपरी-चिंचवड आणि परजिल्ह्यातील तब्बल ७० ते ८० सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली. मोबाईल लोकेशन, तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी पुणे आणि नाशिक जिल्ह्यात लपल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी खेड, मंचर, नारायणगाव, संगमनेर, सिन्नर आणि नाशिक परिसरात शोधमोहीम राबवली. त्यामध्ये पोलिसांनी रोहन मोहन शिंदे (वय २४), योगेश पोपट पवार (वय २३) आणि रविंद्र राजेंद्र शेजुळ (वय ३०) यांच्या मुसक्या आवळल्या. या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल पाटील, शिवाजी चव्हाण, मंगेश फापाळे, अमोल माटे, रेवनाथ खेडकर, आदम शेख, विशाल बंड, सुनील भागवत, महादेव बिक्कड यांनी भाग घेतला होता.

# ‘आर्य नागार्जुन संग्रहालया’चा रौप्य महोत्सव उत्साहात संपन्न

## सध्या जगाला युद्धाची नाही, बुद्धाच्या विचारांची गरज – उपमहापौर परशुराम वाडेकर

पुणे (दै. संध्या) :

बौद्ध इतिहास, संस्कृती आणि सामाजिक वारसा जपणाऱ्या ‘आर्य नागार्जुन संग्रहालया’च्या रौप्य महोत्सवी वर्षाचा सोहळा रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ‘आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिना’चे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कार्यक्रमात संग्रहालयाच्या २५ वर्षांच्या उल्लेखनीय प्रवासाचा आढावा घेण्यात आला. तसेच संग्रहालयाच्या जतन, संवर्धन आणि विस्तारासाठी योगदान देणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. बौद्ध इतिहास आणि संस्कृती संशोधन संस्थेच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या या संग्रहालयाची स्थापना ९ एप्रिल २००० रोजी झाली होती.




गेल्या २५ वर्षांत संग्रहालयाने सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. या वेळी संग्रहालयाचे संस्थापक तथा ज्येष्ठ संग्राहक कै. दिलीप लक्ष्मण वानखेडे यांच्या ऐतिहासिक आणि दुर्मिळ संग्रह जतन करण्याच्या कार्यावर विशेष प्रकाश टाकण्यात आला.

कार्यक्रमात पाली भाषेचे वरिष्ठ अभ्यासक, लिपीतज्ञ आणि लेणी संवर्धक मा. अतुल भोसेकर यांनी ‘बौद्ध संग्रहालयाची वैश्विकता’ या विषयावर विशेष व्याख्यान दिले. त्यांनी इतिहासकालीन दाखल्यांसह महान सम्राट अशोकांनी भारतातील पहिले बौद्ध संग्रहालय कशा प्रकारे उभारले, याविषयी माहिती दिली. संग्रहालयांचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले, “इतिहास आणि संस्कृती जिवंत ठेवण्यात संग्रहालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येकाने वेळोवेळी संग्रहालयांना भेट देऊन त्यांचे बारकाईने अवलोकन केले पाहिजे. लोकसहभागातूनच संग्रहालये जिवंत राहतात.”

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आणि पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर मा. परशुराम वाडेकर यांनी संग्रहालयाच्या २५ वर्षांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. संग्रहालयाच्या विस्तारासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन देताना त्यांनी जागतिक परिस्थितीवर भाष्य केले. “आज जगभर युद्धाचे सावट आहे. अशा परिस्थितीत महात्मा गौतम बुद्ध यांचे शांतता, करुणा आणि बंधुभावाचे विचारच मानवजातीला दिशा देऊ शकतात. सध्याच्या घडीला जगाला युद्धाची नव्हे, तर बुद्धाच्या विचारांची गरज आहे,” असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव मा. बाळासाहेब सावंत यांनी कै. दिलीप वानखेडे यांच्या ऐतिहासिक संग्रहकार्याचा गौरव करत संग्रहालयाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शन वंदनीय भंते नाग दीपंकर महास्थवीर यांनी केले. त्यांच्या हस्ते बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संग्रहालयाच्या अध्यक्षा मा. कल्पना दिलीप वानखेडे यांनी प्रस्तावना व आभार प्रदर्शन केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. दीपक मस्के यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन कुलदीप वानखेडे आणि हर्षवर्धन वानखेडे यांनी केले.

या वेळी स्त्रीभूषण रमाई आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष विठ्ठलराव गायकवाड, पुणे मनपाचे नगरसेवक निलेश आल्हाट, वसुंधरा भोसेकर यांच्यासह सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ड्रोन सर्वेक्षणातून पुण्यातील करबुडव्या मिळकतींचा पर्दाफाश

पुणे (दै. संध्या) :

शहरात चार लाखांहून जास्त मिळकतींना कर न लागल्याने तसेच वापरात बदल करूनही नोंद न झाल्याने महापालिकेचे दरवर्षी कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न बुडत आहे. अशा मिळकतींचा शोध घेण्यावर मिळकतकर विभागाला मर्यादा येत असताना महाप्रित संस्थेच्या थ्रीडी ट्विन ड्रोन सर्वेक्षणातून करबुडव्या मिळकती सहज शोधता येत असल्याचे समोर आले आहे. प्रायोगिक तत्त्वावर केलेल्या सर्वेक्षणात केवळ ९० मिळकतींमधून सुमारे ७५ कोटी रुपयांचे उत्पन्न वाढू शकते, असे स्पष्ट झाले आहे. मात्र महाप्रितने मागितलेल्या मोबदल्यावर तोडगा न निघाल्याने हा प्रस्ताव सध्या रखडला आहे. पुणे शहराच्या सर्वच भागात झपाट्याने बांधकाम होत आहेत. निवासी तसेच व्यावसायिक मिळकतींची संख्या वाढत आहे. पण त्यातुलनेत नवीन मिळकतकराची आकारणी होणाऱ्या मिळकतींची संख्या खूप कमी आहे. त्याचा थेट परिणाम महापालिकेच्या उत्पन्नावर होत आहे. महापालिकेकडून पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर संबंधित बांधकाम व्यावसायिकाने किंवा मिळकतधारकाने करआकारणीसाठी अर्ज करणे अपेक्षित असते. त्यानंतर प्रत्यक्ष मोजणी करून कर निश्चित केला जातो. मात्र ही प्रक्रिया वेळखाऊ असून त्यात पारदर्शकतेचा अभाव असल्याने महापालिकेचे मोठे नुकसान होत आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार शहरात सुमारे चार लाख मिळकतींची नोंदच झालेली नाही. त्यातून महापालिकेला एक हजार कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळू शकतो.

## हवेली पंचायत समिती इमारती दुरुस्तीसाठी, आमदार ज्ञानेश्वर कटके व भीमराव तापकीर यांच्याकडून प्रत्येकी १० लक्ष निधी मंजूर

लोणी काळभोर (दै. संध्या) :

राज्यातील अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या हवेली तालुका पंचायत समितीचा कारभार गेली अनेक वर्षे पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील जुन्या जिल्हा परिषद इमारतीतून सुरू आहे. मात्र या इमारतीची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने येथील सभागृह तसेच विविध विभाग दुरुस्तीस आले असून, पदाधिकारी, कर्मचारी आणि अभ्यागतांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मागील पंधरा दिवसांपूर्वी हवेली तालुक्यातील पाणीटंचाई व पाणंद रस्त्यांच्या आढावा बैठकीचे आयोजन यशवंतराव चव्हाण सभागृहात करण्यात आले होते. यावेळी




आमदार ज्ञानेश्वर कटके व आमदार भीमराव तापकीर उपस्थित होते. बैठकीदरम्यान सभागृहातील ध्वनी व्यवस्था तसेच इतर सुविधांची झालेली दुरवस्था पाहून दोन्ही आमदारांनी नाराजी व्यक्त केली.

यावेळी हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांनी जिल्हा नियोजन समितीकडे इमारत दुरुस्तीसाठी निधीची मागणी केल्याची माहिती दिली. तसेच आमदार निधीतून मदत करण्याची विनंतीही त्यांनी केली.

या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार ज्ञानेश्वर कटके आणि आमदार भीमराव तापकीर यांनी आपल्या आमदार निधीतून प्रत्येकी दहा लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यामुळे हवेली पंचायत समिती इमारतीच्या दुरुस्तीचे काम लवकरच सुरू होणार असून, कर्मचारी व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सभापती युवराज काकडे यांनी दोन्ही आमदारांचे आभार मानले असून, लवकरच अद्ययावत कोनशिलेचे अनावरण करून इमारत दुरुस्ती कामाचे भूमिपूजन आमदार ज्ञानेश्वर कटके व आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे सांगितले.

## महिलांसाठी हिमोग्राम व ब्रेस्ट कॅन्सर तपासणी मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

पुणे (दै. संध्या) :

भारत विकास परिषद कोथरूड आणि समवेदना,यांच्या संयुक्त विद्यमाने वय १५ ते ५० या गटातील सेवा वस्तीतील मुली व स्त्रिया यांचे साठी रक्त तपासणी ( हिमोग्रम ) तसेच स्त्रियांसाठीचा कर्करोग पूर्व निदान तपासणी (ब्रेस्ट कॅन्सर) साठी शिबिर आयोजित केले होते. डॉ अरुण निरंतर,डॉ अलका निरंतर यांनी तपासणी केली.समवेदना संस्थेच्या समन्वयक अबोली खोंडे व सहकारी यांच्या सहकार्याने ब्रेस्ट कॅन्सरची तपासणी केली. ज्यांचे हिमोग्लोबिन कमी आढळले त्यांचेवर मोफत औषधोपचार करण्यात येतील तसेच ज्या स्त्रियांमध्ये ब्रेस्ट कॅन्सरची शक्यता आढळते त्यांना पुढील ट्रीटमेंट साठी समवेदना संस्था मार्गदर्शन करते.



हॅप्पी कॉलनी च्या सभागृहामध्ये हे मोफत शिबिर मंगळवार दिनांक १९ मे रोजी सकाळी साडे दहा ते दुपारी अडीच वाजेपर्यंत आयोजित केले होते.भारत विकास परिषद,कोथरूड शाखा,समवेदना संस्था,साई पॅथॉलॉजी आणि हॅपी कॉलनी सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजिले होते.यामध्ये पन्नास महिलांनी लाभ घेतला.हे शिबिर घेण्यासाठी साठी विनोद दप्तरदार,डॉ शिल्पा हलदुले,एअर व्हाइस मार्शल जयंत इनामदार ( निवृत्त ),माधुरी जयंत इनामदार,भारत विकास परिषदेचे कोथरूड शाखेचे अध्यक्ष संजीव दिवाण सचिव स्मिता जोशी यांनी पुढाकार घेतला. ठाणे जनता सहकारी बँक,साई पॅथॉलॉजी यांचे सहकार्य लाभले. शिबिर यशस्वितेसाठी श्रीधर अनगळ,प्रदीप ओक,शिल्पा दिवाण,अजय बोरवणकर,जयंत साने,गीता कुलकर्णी,स्वाती खांडेकर,राजश्री अभ्यंकर,श्यामकांत उकिडवे,दिलीप लिमये यांनी परिश्रम घेतले. भारत विकास परिषद कोथरुड शाखा आणि समवेदना संस्था यांच्यातर्फे हे मोफत शिबिर आयोजित केले होते.हॅपी कॉलनी,गोसावी वस्ती,डहाणूकर कॉलनी परिसर मधील पन्नास महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला.

## तरुणावर दांडके-दगडांनी हल्ला

पुणे (दै. संध्या) :

छत्रपती संभाजी महाराज जयंती मिरवणुकीदरम्यान झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर भांडणात झाले आहे. मोटारसायकल पुढे घेण्याच्या कारणावरून एका तरुणास दांडके आणि दगडांनी हल्ला केल्याने तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याला वाचवण्यासाठी आलेल्या आई-वडिलांनाही मारहाण करण्यात आली आहे. याप्रकरणी प्रमोद मोहन काळभोर (वय ३०, रा. साठेवस्ती, लोणी काळभोर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अभि आहेरकर, अभिषेक रामपुर, पम्या शिरसट यांच्यासह इतर साथीदारांविरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काळभोर हे गावात औषध घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त मिरवणूक सुरू असल्याने मोठी गर्दी आणि वाहतूक कोंडी झाली होती. ते मोटारसायकलसह थांबले असताना मागून आलेल्या काही तरुणांनी त्यांना वाहन पुढे घेण्यास सांगितले. पुढे गर्दी असल्याचे सांगताच त्या तरुणांनी शिवीगाळ सुरू केली. वाद वाढत असल्याचे पाहून काळभोर हे मोटारसायकल घेऊन घराकडे निघाले. संबंधित तरुणांनी मोटारसायकलवरून त्यांचा पाठलाग केला. तारासिटीसमोरील कामठे यांच्या टपरीजवळ प्रमोद मोटारसायकल लावत असतानाच आरोपी तेथे पोहोचले आणि एकाने हातातील लाकडी दांडक्याने त्यांच्यावर वार केला.

त्यानंतर काही जणांनी

# बजाज जनरल इन्श्युरन्सचा एमएचसीपी एजप्लस लाँच

पुणे (दै. संध्या) :

भारताची आघाडीची प्रायव्हेट जनरल इन्श्युरन्स बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड) ‘माय हेल्थ केअर प्लॅन एज+’ (एमएचसीपी एज+) नव्या प्लॅनची घोषणा केली आहे. वाढत्या आरोग्यसेवेवरील खर्चांना सामोरे जाण्यासाठी आणि अधिक लवचिकता व सानुकूलनाद्वारे स्वतःच्या खिशातून होणारा खर्च कमी करण्यासाठी या खास प्रगत, सुधारित सर्वसमावेशक हेल्थ इंडेम्निटी प्लॅनची निर्मिती करण्यात आली आहे.

सध्याच्या एमएचसीपी स्कीमच्या मजबूत पायावर आधारित एमएचसीपी एज+ मध्ये मूलभूत हॉस्पिटलायझेशन कव्हरेज सोबत विविध पर्यायी रायडर्सचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे कस्टमरला बदलत्या आरोग्यविषयक गरजा, जीवनातील टप्पे आणि माफकता यानुसार आपली पॉलिसी




सानुकूलित करता येते. या स्कीम मध्ये ₹ 5 लाखांपासून ते ₹ 5 कोटींपर्यंत इन्श्युरन्स रकमेचे पर्याय उपलब्ध आहेत. तसेच, एका पॉलिसी वर्षात इन्श्युरन्स रक्कमेची अनलिमिटेड रिइनस्टेटमेंट सुविधा दिली जाते. ज्यामुळे एकाधिक क्लेम झाल्यासही सतत संरक्षण कायम राहते. बेस प्लॅन रुम भाडे, आयसीयू शुल्क, शस्त्रक्रिया, आधुनिक उपचार पद्धती, आयुष उपचार आणि हॉस्पिटलायझेशन पूर्वी आणि नंतरच्या खर्चासह हॉस्पिटलायझेशन खर्चासाठी सर्वसमावेशक कव्हरेज प्रदान करते. हे डे केअर प्रक्रिया, घरगुती हॉस्पिटलायझेशन, अवयव दात्याचा खर्च आणि आपत्कालीन ॲम्ब्युलन्स सेवा देखील कव्हर करते. ज्यामुळे वैद्यकीय आकस्मिकतेच्या दरम्यान संपूर्ण आर्थिक संरक्षण उपलब्धतेची खात्री मिळते.

मॉड्यूलर रचना हे एमएचसीपी एज+ चे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. ज्यामुळे कस्टमरला विविध ॲड-ऑन्स आणि रायडर्सद्वारे इन्श्युरन्स कव्हरेजचा विस्तार करता येतो. यामध्ये डिस्चार्जच्या वेळी बिगर भरपाईयोग्य खर्च कमी करण्यासाठी कंझ्युमेबल प्लस, इन्श्युरन्स रकमेची जलद वाढ करण्यासाठी सुपर क्युम्युलेटिव बोनस, तसेच गंभीर आजार किंवा अपघाताच्या प्रसंगी अधिक संरक्षण देण्यासाठी मेजर इलनेस अँड ॲक्सिडेंट मल्टिप्लायर लाभ समाविष्ट आहेत. हे प्रॉडक्ट परदेशातील आपत्कालीन तसेच नियोजित उपचारांसाठी ग्लोबल कव्हरेजचे पर्यायही देते. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय आरोग्यसेवेची गरज असलेल्या कस्टमरच्या गरजांची पूर्तता होते.

याशिवाय, एमएचसीपी एज+ मध्ये दीर्घकालीन माफक किंमत आणि भविष्यातील गरजांच्या अनुरुप निर्मित वैशिष्ट्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. एज शील्ड रायडरमुळे कस्टमरला क्लेम होईपर्यंत प्रवेशाच्या वयातील प्रीमियम निश्चित ठेवता येतो. तर स्मार्ट टेन्युअर मुळे कस्टमरला संपूर्ण पॉलिसी कालावधीतील इन्श्युरन्स रक्कम एकत्रित करता येते. त्यामुळे त्यांना एकूण मोठे कव्हरेज उपलब्ध होते. जे पॉलिसीच्या सुरुवातीच्या वर्षांतही गरजेनुसार वापरता येते. कस्टमर ग्लोबल कव्हर पर्याय निवडू शकतात. ज्यामुळे परदेशातील नियोजित तसेच आपत्कालीन उपचारांसाठी कव्हरेज मिळते आणि भारताबाहेरील आरोग्यसेवेचाही लाभ घेता येतो. हेल्थ लिमिटलेस रायडर हा पॉलिसीच्या संपूर्ण कालावधीत वार्षिक इन्श्युरन्स रकमेची कोणतीही मर्यादा नसलेला क्लेम उपलब्ध करून देत संरक्षण अधिक बळकटी करतो. या प्लॅन मध्ये वेलनेस आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेच्या पलीकडे विस्तार पाहायला मिळतो. हेल्थ प्राईम रायडर सारख्या पर्यायी सुविधांमध्ये टेलिकन्सल्टेशन, क्लिनिकमधील सल्लामसलत, निदान सहाय्य, प्रतिबंधात्मक आरोग्य तपासण्या तसेच जीवनशैली आणि फिटनेस संबंधित सेवा समाविष्ट आहेत.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

इ-निविदा सूचना
क्र.ना.औ.वी.कें/२०२६-२७/०५

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) / इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३००००६८६८५ / सीएचपी | सीएचपी यार्डमध्ये कोरडया कोळशाचा साठा राखण्यासाठी ताडपत्री टाकणे, काढणे, देखरेख करण्याचे काम. | ५५,४५,५६२/- / ५८,९६०/- |
| २. | ३००००६८६९४ / बीएम | युनिट ४ कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान बॉयलरच्या वेल्डमेंटचा ताण कमी करण्यासोबत सुपर हिटर, रिहिटर आणि इकॉनोमायझर हेडर स्टबच्या गॅस टंगस्टन आर्क वेल्डिंगचे काम. | ५४,७४,९८२/- / ५८,२५०/- |
| ३. | ३००००६८६९५ / बीएम | संच क्र. ४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान बॉयलर आवरण, पेन्टहाऊस हेडर, एचआरएच आणि सीआरएच लाइन्सला जीआय आणि रिब्ड शीट क्लेडिंगसह थर्मल इन्सुलेशन काढणे आणि बसवणे. | ५०,००,५४५/- / ५३,५१०/- |
| ४. | ३००००६८७०० / बीएम | युनिट ४ च्या कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान दुसऱ्या पासमध्ये बॉयलर टयूब आणि बेंड बदलण्याचे काम. | ७८,३३,९६१/- / ८१,८४०/- |
| ५. | ३००००६८७०४ / टीएम | संच क्र. ३,४, आणि ५ च्या स्पेअर्स पुरवठयासह प्लेट हीट एक्सचेंजर, मॉडेल-P31 (DM/GS कूलर) ची दुरूस्ती. | ५२,५८,१८६/- / ५६,१००/- |
| ६. | ३००००६८७४३ / सिव्हिल | स्टेज २ मधील जलनिसर्ग व्यवस्थेला व्यवस्थित ठेवण्यासाठी पावसाळयाच्या आधी छताचे स्लॅब, सज्जा, टेरेस, ओपन ड्रेन, रेन वॉटर डाऊन टेक पाईप, ऑक्झीलरी बिल्डींगचे गटार, नियंत्रण कक्षाचे छत यांची स्वच्छता करणे आणि सायकल स्टॅंड स्टेज २ ते १६सी२ बेल्टपर्यंतचा नाला, ओपन ड्रेनची स्वच्छता करणे. | ७,९७,५७९/- / ११,४८०/- |

नविन विक्रेते / नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
प्रत्येक निविदा किंमत रू. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया
https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता,
नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे

## थोडक्यात पण महत्वाचे...




### प्रभाग समित्या वाढीचा 'तो' आदेश रद्द, चुकीच्या आदेशामुळे आयुक्त तोंडघशी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कारभाराचा सावळागोंधळ पुन्हा एकदा समोर आला आहे. प्रभाग समित्यांची संख्या ८ वरून १० करण्याच्या घाईघाईने घेतलेल्या निर्णयावरून सर्वसाधारण सभेत सत्ताधारी आणि प्रशासनाची चांगलीच फजिती झाली. दोन दिवसांपूर्वी स्वतःच्या अधिकृत स्वाक्षरीने काढलेला आदेश रद्द करण्याची नामुष्की महापालिका आयुक्तांवर आली. सत्ताधाऱ्यांनी आणलेल्या चुकीच्या उपसूचनेमुळे प्रशासन आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना तोंडघशी पडावे लागले आहे. महापालिकेत सत्ता आल्यानंतर भाजप सरकारने दोन प्रभाग समित्या वाढवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करत १० क्षेत्रीय कार्यालये स्थापन करण्याचा प्रस्ताव मंजूर केला. हा निर्णय २५ मे २०२६ पासून लागू होणार असल्याचा आदेश आयुक्त सूर्यवंशी यांनी स्वाक्षरी करून जारी केला होता. मात्र, शुक्रवारी (दि.१५) झालेल्या सर्वसाधारण सभेत शिवसेना नगरसेविका सुलभा उबाळे यांनी ही उपसूचना कायद्याशी विसंगत आणि बेकायदेशीर असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. हा प्रकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रशासकीय खर्चात कपात करण्याच्या आवाहनाला केराची टोपली दाखवणारा असल्याची टीका त्यांनी केली. या वाढीव कार्यालयांवरून महापालिकेत जोरदार राजकीय रणकंदन पाहायला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी कडाडून विरोध करत, "केवळ राष्ट्रवादीचा प्रभाग अध्यक्ष होऊ नये, यासाठी सत्ताधाऱ्यांनी रचलेला हा 'दिखाऊ काम, फसावू धंदा' आहे," अशी घणाघाती टीका केली. तर, महापालिकेवर नाहक आर्थिक बोजा वाढवणारा हा निर्णय रद्द करण्याची मागणी शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांनी केली. वाढत्या गदारोळानंतर महापौर रवी लांडगे यांनी पूर्वीचा ठराव आणि आयुक्तांचा आदेश रद्द करण्यात आल्याची माहिती सभागृहात दिली.



### लोणावळा–खंडाळ्यात पर्यटकांची प्रचंड गर्दी; महामार्गावर वाहतूककोंडी

लोणावळा (दैनिक संध्या) : लोणावळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी झाली आहे. पर्यटकांच्या या गर्दीमुळे राष्ट्रीय महामार्गावर दुतर्फा मोठी वाहतूककोंडी झाली आहे. सकाळपासूनच लोणावळा शहरात वाहनांची गर्दी वाढण्यास सुरुवात झाली. दिवसभर ही गर्दी कायम होती. मिसिंग लिंकमुळे खंडाळा घाटातील वाहतूककोंडी सुटली आहे. त्यामुळे लोणावळा, खंडाळा शहरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली आहे. घाटातील कोंडी कमी झाल्यामुळे कोकण परिसरात जाणारे पर्यटक आता थंड हवेच्या ठिकाणांना पसंती देऊ लागले आहेत. मुंबईपासून जवळचे पर्यटनस्थळ व थंड हवेचे ठिकाण म्हणून लोणावळा, खंडाळा या शहरांना पर्यटक पसंती देत आहेत. राज्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात उष्णता वाढली आहे. या जीवघेण्या गर्मीपासून थोडासा दिलासा मिळावा, याकरिता पर्यटक आपल्या कुटुंबासह थंड हवेच्या ठिकाणी येत आहेत. लोणावळा शहरातदेखील यावर्षी गरमीचे प्रमाण अधिक आहे. दुपारच्या वेळेस कडक ऊन असले तरी सकाळ व संध्याकाळ लोणावळ्यातील वातावरण थंड व अल्हाददायी असल्यामुळे पर्यटक लोणावळ्याकडे आकर्षित होत आहेत. खंडाळ्यातील राजमाची पॉइंट, ड्युक्स नोज पॉइंट, खंडाळा बोटिंग या ठिकाणी पर्यटक सकाळ, संध्याकाळ गर्दी करत आहेत. लायन्स पॉईंट, आई एकवीरा देवी मंदिर, तुंगार्ली तलाव, भाजे लेणी, पवना धरण परिसर या भागात पर्यटक मोठ्या संख्येने जात आहेत. तेथील निसर्ग व थंड हवेचा आनंद घेत आहेत. पर्यटकांच्या वाढत्या गर्दीमुळे अंतर्गत लहान रस्ते व मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर वाहतूककोंडी होत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.



### किवळे शेअर मार्केट घोटाळा; 1.22 कोटींची फसवणूक करून आरोपी फरार

पिंपरी (दैनिक संध्या) : शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास दरमहा पाच टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवत गुंतवणूकदारांची एक कोटी 22 लाख 75 हजार 900 रुपयांची फसवणूक करण्यात आली. हा प्रकार 3 एप्रिल 2024 ते 15 मे 2026 या कालावधीत एनबीएम ट्रेडर्स, किवळे येथे घडला. या प्रकरणी नितीन भास्कर माने (रा. मंगलविश्व सोसायटी, किवळे) याच्याविरुद्ध देहूरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सध्या फरार असून, रावेत येथील एका पुरुषाने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी नितीन माने याने फिर्यादीसह अनेक गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला होता. शेअर मार्केटमधून मोठा नफा मिळवून देण्याचे आश्वासन देत त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पैसे घेतले होते. फिर्यादीकडून 15 लाख रुपये घेतल्यानंतर त्यापैकी केवळ 9 लाख रुपये परत करण्यात आले. उर्वरित 5 लाख 91 हजार रुपये तसेच इतर 11 गुंतवणूकदारांचे 1 कोटी 16 लाख 84 हजार रुपये आरोपीने परत केले नाहीत. पैशांची मागणी सुरू होताच आरोपीने मोबाइल बंद करून संपर्क तोडला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गुंतवणूकदारांनी पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक वाघमारे करीत आहेत.

# शहरातील विकासकामे, अतिक्रमण नियंत्रण आणि नालेसफाई कामांचा आयुक्तांनी घेतला आढावा

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहरात नव्याने होणाऱ्या अनधिकृत बांधकामांना आणि अतिक्रमणांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. शहराच्या नियोजनाला बाधा आणणाऱ्या अशा प्रकारांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच कारवाई करून मोकळ्या करण्यात आलेल्या जागांवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी प्रभावी उपाययोजना राबवून त्या ठिकाणी मुलांसाठी खेळाची मैदाने विकसित करावीत तसेच वृक्षलागवड करून हरित क्षेत्र निर्माण करावे, असे निर्देश महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सर्व विभागप्रमुख आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागप्रमुखांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयुक्त कार्यालयात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शहर विकासाच्या दृष्टीने सुरू असलेल्या विविध कामांचा आढावा, नागरिकांशी संबंधित मूलभूत समस्या, पावसाळ्यापूर्व तयारी तसेच विविध विभागांमधील समन्वय याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, अजय सूर्यवंशी, उप आयुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, डॉ. प्रदीप ठेंगल, सिताराम बहुरे यांच्यासह अ, ब, क, ड, ई, फ, ग व ह क्षेत्रीय कार्यालयांचे क्षेत्रीय अधिकारी ऑनलाईन सहभागी झाले होते.



शहराच्या नियोजनावर परिणाम करणारी बेकायदा बांधकामे वेळेत रोखली गेली नाहीत, तर भविष्यात गंभीर नागरी समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात नियमित पाहणी करून नव्याने सुरू होणाऱ्या बांधकामांवर बारकाईने लक्ष ठेवावे. अतिक्रमण अथवा अनधिकृत बांधकाम निदर्शनास येताच कोणतीही दिरंगाई न करता तत्काळ कारवाई करावी, असे निर्देशही आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिले.

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात पूरस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी नालेसफाईची कामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात यावा. नालेसफाईच्या कामांमध्ये कोणताही हलगर्जीपणा होऊ नये, संवेदनशील भागांमध्ये विशेष लक्ष द्यावे तसेच नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही करावी, असे आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले. यासोबतच नाल्यांच्या प्रवाहात अडथळा निर्माण करणारी नाल्यांवरील अतिक्रमणे तात्काळ हटवून पाण्याचा नैसर्गिक निचरा सुरळीत ठेवण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीत शहरातील पाणी चोरी रोखण्यासाठी उपाययोजना, विविध भागांतील पाणी समस्यांचे निराकरण, कामगार कट्ट्यांचे नियोजन, संभाव्य पूर व्यवस्थापन, उद्यानांची देखभाल, रस्त्यांच्या दुभाजकांमधील वृक्षांचे संवर्धन तसेच रस्ता रुंदीकरणाच्या कामांचा आढावा घेण्यात आला. संबंधित कामांतील त्रुटी दूर करून अधिक समन्वयाने आणि जबाबदारीने काम करण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

## 'अंतर्नाद' या भव्य संगीत नाटकाच्या शुभारंभ प्रयोगाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी (दै. संध्या)**

आजच्या युगात प्रत्येक माणूस हरवलेला आहे. "स्व" मधला विठ्ठल शोधण्यासाठी "अंतर्नाद" पहावा. साक्षात विठ्ठल दर्शनाची अनुभूती मिळते. भक्तीरसाने ओथंबलेल्या यातील प्रत्येक कलाकार आपल्याला वारीला न जाताही वारी अनुभवायची संधी देतात. अंतर्नाद या संगीत नाटकातील एकही गीत कॉपी केलेले नाही केवळ या प्रयोगासाठी लिहिले आहेत हे नाविन्यपूर्ण आहे. शुभारंभाचा हा प्रयोग संस्मरणीय झाला आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी केले.

'अंतर्नाद' या संगीत नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग शनिवारी, (दि.१६) चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात पार पडला. यावेळी आयुक्त बोलत होते. यावेळी तुडुंब भरलेल्या प्रेक्षागृहात आळंदी ज्ञानेश्वर संस्थान कमिटी अध्यक्ष भावार्थ देखणे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष व मोरया थिएटरचे संस्थापक, "अंतर्नाद" चे निर्माते भाऊसाहेब भोईर आदी उपस्थित होते.



या भव्य संगीत नाटकाचा दुसरा प्रयोग हडपसर येथील विठ्ठलराव तुपे नाट्यगृहात शुक्रवारी (दि. २२ मे), सायंकाळी सात वाजता होणार आहे. रसिक प्रेक्षकांसाठी या नाटकाची तिकिटे 'बुक माय शो' आणि 'तिकीट खिडकी' या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. अंतर्नाद चे कलाकार प्रणव सपकाळे, मनोज डाळिंबकर, निरंजन पेडगावकर, अंकिता शिवतरे, राजू बंग आदींसह सर्वांनी उत्तम कामगिरी करत पहिलाच प्रयोग यशस्वी केला आहे अशी माहिती दिग्दर्शक मनोज डाळिंबकर यांनी दिली.

## नवीन प्रशासकीय इमारत आणि डेअरी फार्म रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पाच्या कामांची अतिरिक्त आयुक्त जंगम यांच्याकडून पाहणी

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारत तसेच डेअरी फार्म उड्डाणपूल प्रकल्पाअंतर्गत येणारी पावसाळ्यापूर्वीची सर्व महत्त्वाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. विशेषतः प्रकल्प परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण, पाणी निचरा व्यवस्था आदी कामे पुर्ण करण्यावर भर द्यावा. याशिवाय, प्रकल्पाच्या कामांचा प्रगती अहवाल दर १५ दिवसांनी सादर करण्यात यावा. तसेच आवश्यक अंदाजपत्रकीय तरतुदींसाठी सर्व प्रशासकीय आणि तांत्रिक बाबींची तत्काळ पूर्तता करून प्रकल्पांच्या कामाला गती द्यावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी दिले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी आज पिंपरी येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाची तसेच डेअरी फार्म परिसरात सुरू असलेल्या रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पाच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते.

या पाहणीदरम्यान मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता प्रेरणा सिनकर, कार्यकारी अभियंता विजय भोजने, संध्या वाघ तसेच उपअभियंते, कनिष्ठ अभियंते आणि संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचा तसेच डेअरी फार्म उड्डाणपूल प्रकल्पासंबंधित सर्व विभागांनी कामांमध्ये अधिक समन्वय ठेवून प्रकल्पांची गती वाढविणे आवश्यक आहे. पावसाळ्यापूर्वीची सर्व महत्त्वाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. विशेषतः प्रकल्प परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण, पाणी निचरा व्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित कामे वेळेत पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## एचएसआरपी नंबर प्लेटवरून नागरिकांचा संताप; नवलाख उंबरेत नियमभंग वाढला

**पिंपरी (दै. संध्या)**

राज्य शासनाच्या आदेशानुसार जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट अर्थात एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याची मोहीम गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आली. प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करत अनेक जागरूक नागरिकांनी आपल्या वाहनांच्या जुन्या नंबर प्लेट बदलून नवीन एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घेतल्या. मात्र, आता हेच नागरिक प्रशासनाच्या भूमिकेबाबत तीव नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत.

एचएसआरपी नंबर प्लेट बसविताना अनेक वाहनधारकांकडून जादा शुल्क आकारण्यात आल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. स्लॉट मिळवण्यासाठी अनेकांना दिवसेंदिवस प्रतीक्षा करावी लागली, तर काहींनी आपली कामे बाजूला ठेवून वेळ काढत ही प्रक्रिया पूर्ण केली. नियमांचे पालन व्हावे, वाहनांची सुरक्षित ओळख पटावी आणि भविष्यात दंडात्मक कारवाई टाळता यावी, या उद्देशाने नागरिकांनी पैसा आणि वेळ दोन्ही खर्च केले.

महाराष्ट्र परिवहन विभागाने 18 फेब्रुवारी 2026 पासून एचएसआरपी नियमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होणार असल्याचे जाहीर केले होते. तसेच 31 डिसेंबरपूर्वी स्लॉट बुक केलेल्या वाहनधारकांना काही प्रमाणात सवलतही देण्यात आली होती. त्यामुळे एचएसआरपी न बसवलेल्या वाहनांवर कठोर कारवाई होईल, अशी अपेक्षा होती.

मात्र प्रत्यक्ष परिस्थिती वेगळीच दिसत आहे. आता पुन्हा तारीख वाढवण्यात आली असून, जून महिनाअखेरपर्यंत अजून मुदत देण्यात आलेली आहे. त्यामुळे अजूनही अनेक ठिकाणी जुन्या नंबर प्लेट असलेली वाहने रस्त्यावर सर्रास फिरताना दिसत आहेत. एवढेच नव्हे, तर काही वाहने थेट विनानंबर प्लेटच रस्त्यावर धावत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## पिंपरी-चिंचवड भाजपाचे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' उत्साहात संपन्न

**पिंपरी (दै. संध्या)**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभरात राबविण्यात येत असलेल्या 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' अंतर्गत पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याचा दोन दिवसीय भव्य निवासी प्रशिक्षण वर्ग लोणावळा येथे उत्साहात पार पडला. या प्रशिक्षण वर्गात पक्षाची विचारधारा, संघटनात्मक शिस्त, समाजाप्रती बांधिलकी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या महाअभियानात महाराष्ट्रातील अनेक प्रमुख नेत्यांनी सहभाग घेत विविध १२ विषयांवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील १५० हून अधिक पदाधिकाऱ्यांनी प्रशिक्षण वर्गात सहभाग नोंदविला.

प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भारतमाता, डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी आणि पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी पक्षाच्या स्थापनेपासूनची माहिती देणारी भव्य प्रदर्शनीही उभारण्यात आली होती.




यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी "शतप्रतिशत भाजपा" हा विचार प्रत्येक घराघरात पोहोचवण्याचे आवाहन केले. देशात हजारो राजकीय पक्ष असले तरी केवळ भाजपामध्येच सातत्याने शाश्वत कार्य सुरू राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचा सुवर्णकाळ सुरू असल्याचे सांगत कार्यकर्त्यांनी सामान्य नागरिकांना 'हवेहवेसे' वाटतील असे काम करावे, असा सल्लाही त्यांनी दिला. सार्वजनिक जीवनात वावरताना पक्षाची प्रतिमा उंचावेल असे वर्तन ठेवणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी पक्षशिस्त, प्रामाणिकपणा आणि प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान यावर भर दिला. "पिंपरी-चिंचवडच्या प्रत्येक गल्लीमध्ये भाजपा दिसला पाहिजे," असेही त्यांनी स्पष्ट केले.

उद्घाटनप्रसंगी आमदार चित्रा वाघ, रवींद्र अनासपुरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार अश्विनी जगताप, माजी खासदार अमर साबळे, संघटन सरचिटणीस ॲड. मोरेश्वर शेडगे, सदाशिव खाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षण वर्गाच्या पहिल्या दिवशी व्यावहारिक कार्यपद्धती, वैचारिक अधिष्ठान, कार्य विस्तार, मीडिया व्यवस्थापन, कार्यपद्धती, देशासमोरील आव्हाने आणि कार्यकर्ता विकास या विषयांवर विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी योगा व व्यायाम सत्राने दिवसाची सुरुवात झाली. त्यानंतर बूथ व्यवस्थापन, भाजपा इतिहास, केंद्र सरकारच्या योजना, सोशल मीडिया, AI, नमो ॲप, सरल ॲप आणि विचार परिवार या विषयांवर सत्रांचे आयोजन करण्यात आले.

## आ.महेश लांडगेंना यंदाचा 'स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार' जाहीर..!

### ज्येष्ठ विचारवंत अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते सन्मान

**पिंपरी (दै. संध्या)**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्ताने दिला जाणारा यंदाचा प्रतिष्ठित 'स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार' भोसरी विधानसभेचे आमदार आणि प्रखर हिंदुत्ववादी नेते महेश लांडगे यांना जाहीर करण्यात आला आहे.

ब्राह्मण जागृती सेवा संघातर्फे या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, रविवार दिनांक २४ मे रोजी सायंकाळी ५ वाजता निगडी येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात हा भव्य कार्यक्रम पार पडणार आहे, अशी माहिती संयोजक राजन लोणकर यांनी पत्रकाद्वारे दिली.

ब्राह्मण जागृती सेवा संघातर्फे दरवर्षी पिंपरी-चिंचवड शहरात सावरकर जयंतीनिमित्त जाहीर कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या वर्षीच्या कार्यक्रमात 'सावरकर समजून घेताना' या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर माजी सनदी अधिकारी तथा 'चाणक्य मंडळ परिवाराचे' प्रमुख, ज्येष्ठ विचारवंत अविनाश धर्माधिकारी यांचे मुख्य मार्गदर्शन लाभणार आहे.

निगडी येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात होणारा हा सोहळा विचार आणि कर्तृत्वाचा सुवर्णसंगम ठरणार आहे. या सोहळ्याला आणि व्याख्यानाला पिंपरी-चिंचवड शहर व परिसरातील तमाम राष्ट्रभक्तांनी आणि नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ब्राह्मण जागृती सेवा संघ आणि संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

पुरस्काराची घोषणा करताना संयोजकांनी सांगितले की, आमदार महेश लांडगे हे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण महाराष्ट्रात एक आक्रमक हिंदुत्ववादी वक्ते म्हणून परिचित आहेत. त्यांचे धर्मजागरण, गोरक्षा आणि सामाजिक ऐक्याच्या विविध विषयांवरील दौरे आता संपूर्ण राज्यभर सुरू आहेत. विविध हिंदू संमेलनांच्या माध्यमातून ते सातत्याने समाजाला दिशा देण्याचे काम करत आहेत. त्यांच्या याच 'देव, देश आणि धर्म' या त्रिसूत्रीवरील अखंड कार्याची आणि योगदानाची दखल घेऊन यंदाचा 'स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार' त्यांना प्रदान करण्यात येत आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे...



### विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करत वात्सल्य सिंधू फाउंडेशनचे प्रेरणादायी सामाजिक कार्य

शिरूर (दैनिक संध्या) : समाजातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत त्यांच्या यशाचा गौरव करण्याचे उल्लेखनीय कार्य वात्सल्य सिंधू फाउंडेशनच्या माध्यमातून सातत्याने करण्यात येत आहे. सामाजिक, शैक्षणिक व मानवतावादी उपक्रमांद्वारे संस्था परिसरात आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. इयत्ता १० वी परीक्षेत 97.40 टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन करणाऱ्या प्रणव बढे यांचा वात्सल्य सिंधू फाउंडेशनच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा सुनंदा विजय लंघे व सचिव उषा शैलेंद्र वाखारे यांनी प्रणव यांना पुष्पगुच्छ व टॉफी देऊन अभिनंदन केले तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या यशामुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा देण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे सांगितले. वात्सल्य सिंधू फाउंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम, गरजू विद्यार्थ्यांना मदत, महिला सक्षमीकरण तसेच समाजोपयोगी कार्य सातत्याने राबविले जात असून संस्थेच्या या कार्याचे परिसरातून कौतुक होत आहे.

### अहिल्यादेवी होळकर विठ्ठल मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी नगरीतील सर्व हरिहर भक्तांसाठी अधिक मासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, बुधवार दिनांक 20 मे 2026 ते दिनांक 10 जून 2026 या कालावधीत अहिल्यादेवी होळकर विठ्ठल मंदिर येथे दररोज सायंकाळी 6 ते 8 या वेळेत धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. या कार्यक्रमामध्ये विष्णुसहस्त्रनामाचे एक आवर्तन, संत ज्ञानेश्वर महाराज लिखित हरिपाठ, गुरुपरंपरेतील अभंग वाचन तसेच "ॐ नमो भगवते वासुदेवाय पुरुषोत्तमा" या मंत्राचा दररोज 51 माळांचा मंत्रजप करण्यात येणार आहे. त्यानंतर आरती सोहळा पार पडणार आहे. तसेच गुरुवार दिनांक 11 जून 2026 ते शनिवार दिनांक 13 जून 2026 या कालावधीत सायंकाळी 6 ते 8 या वेळेत विविध विषयांवर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांचा लाभ जेजुरी परिसरातील सर्व भाविक व हरिहर भक्तांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अशी माहिती हरिभक्त परायण यशवंत भालेराव महाराज यांनी दिली.

### महावितरणच्या 'स्मार्ट योजना 2025' ला नागरिकांचा प्रतिसाद"

शिरूर (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासन व महावितरण यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम सौर घर सोलर रूपटॉफ योजने अंतर्गत राबविण्यात येणारी "स्मार्ट योजना 2025" ही घरगुती वीज ग्राहकांसाठी फायदेशीर योजना ठरत आहे. या योजनेअंतर्गत 1 किलोवॅट रूफटॉप सोलर सिस्टीम बसविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. या योजनेमुळे नागरिकांच्या वीज बिलात बचत होण्याबरोबरच स्वच्छ व हरित ऊर्जेचा वापर वाढीस लागणार आहे. अतिरिक्त वीज निर्मितीद्वारे उत्पन्नाची संधीही उपलब्ध होणार असल्याने नागरिकांकडून या योजनेकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले जात आहे. योजनेसाठी वैध घरगुती वीज जोडणी असणे आवश्यक असून मागील 12 महिन्यांतील वीज वापर 100 युनिटपेक्षा कमी असलेल्या ग्राहकांना प्राधान्य दिले जाणार आहे. BPL ग्राहकांना 47 हजार 500 रुपये, SC/ST ग्राहकांना 45 हजार रुपये तर सर्वसाधारण व OBC ग्राहकांना 40 हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. महावितरण उपविभागीय कार्यालय, उपअभियंता शरद माने सहाय्यक अभियंता वैभव बारवकर यांनी नागरिकांनी या स्मार्ट योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. तसेच सौर ऊर्जेचा वापर वाढवून पर्यावरणपूरक आणि स्वयंपूर्ण जीवनशैलीकडे वाटचाल करण्याचेही त्यांनी सांगितले.

### शुभदाताई वाव्हळ यांना "उत्कृष्ट ग्रामविकास सन्मान पुरस्काराने" सन्मानित



नारायणगाव (दैनिक संध्या) : उत्तर पूणे जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत कार्यक्षमपणे चालवणाऱ्या ग्रामपंचायत नारायणगाव नगरीच्या लोकनियुक्त महिला सरपंच डॉक्टर सौ. शुभदाताई पंकज वाव्हळ यांची आदर्श सरपंच म्हणून निवड करण्यात आली असून त्यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. त्यांना 'उत्कृष्ट ग्रामविकास सन्मान पुरस्कार २०२६' जाहीर झाल्याबद्दल तमाम नारायणगावकरांच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.



### ग्रामरोजगार सहाय्यकांचे थकीत मानधन तत्काळ द्या; किसान सभेचा इशारा

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर तालुका ग्रामरोजगार सहाय्यकांचे मानधन तत्काळ द्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा जुन्नर तालुका किसान सभेच्या वतीने देण्यात आला आहे. यासंबंधीचे निवेदन गटविकास अधिकारी प्रतिक चन्नावार यांना देण्यात आले या वेळी गटविकास अधिकारी यांच्यासोबत किसानसभेच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चा केली या चर्चेमध्ये BDO यांनी ग्राम रोजगार सेवकांचे मानधन उद्यापासून वितरित करण्याचे मान्य केले आहे. तसेच मागील चार वर्षांपासून रोजगार हमी योजने अंतर्गत अंतर्गत गाई गोठा धारक शेतकऱ्यांनचे पैसे प्रलंबित आहेत. या विषयी चर्चा केली असता BDO यांनी पुढील आठ दिवसात गाय गोठा धारक शेतकऱ्यांचे पैसे जमा होतील असे सांगितले. निवेदनात म्हटले आहे की, ग्रामरोजगार सहाय्यकांचे मानधन गेल्या सहा महिन्यांपासून मिळालेले नाही, ग्रामरोजगार सहाय्यकांना गाव पातळीवर काम करत असून त्यांना सहा सहा महिने मानधन मिळत नसेल तर हे चिंतेची बाब असून तत्काळ मानधन अदा करावित, अन्यथा किसान सभा तीव्र आंदोलन करेल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच गाई गोठा कुशल ची रक्कम अदा करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदन देते वेळी किसान सभेचे अध्यक्ष कोंडीभाऊ बांबळे, सचिव मुकुंद घोडे, सहसचिव नारायण वायळ, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव गणपत घोडे, पांडुरंग ढेंगळे, संदिप शेळकंदे, कल्याणी राऊत, किरण हिले, गणेश ताजणे आदी उपस्थित होते.

# हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

## गोशाळांना १२ टन हिरव्या चाऱ्याचे मोफत वाटप!



**राजगुरुनगर (दै. संध्या)**

सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशन, च्या वतीने मुक्या जनावरांसाठी *"चारा वाटप उपक्रम"* अत्यंत यशस्वीपणे राबविण्यात येत असून, तालुक्यातील चार प्रमुख गोशाळांना तब्बल १२ टन हिरवागार मक्याचा चारा मोफत देण्यात आला आहे.

उन्हाची तीव्रता वाढल्याने नागरिक हवालदिल झाला आहे. वाढत्या तापमानामुळे पाणी टंचाई, जनावरांसाठी चारा प्रश्न निर्माण होऊन मुक्या जनावरांचे हाल होऊ नयेत,व गोशाळांमधील गोधनाची उपासमार होऊ नये, यासाठी हुतात्मा राजगुरू फाऊंडेशनने दरवर्षी प्रमाणे पुढाकार घेत तालुक्यातील ४ प्रमुख गोशाळांमध्ये एकूण '१२ टन' दर्जेदार हिरव्यागार मक्याच्या चाऱ्याचे वाटप करण्यात आले.* ऐन उन्हाळ्यात गोधनासाठी हिरवा सुग्रास चारा मिळाल्याने गोशाळा प्रशासनाने फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे मोठे कौतुक करून आभार मानले आहेत.

*असे झाले चारा वाटप (गोशाळानिहाय तपशील)*

आचार्य विनोबा भावे गोशाळा (कोयाळी) ४ टन

माऊली गोशाळा (बिरदवडी) ३ टन

श्रीसमर्थ गोशाळा (श्री क्षेत्र भीमाशंकर) ३ टन

श्री क्षेत्र कुंडेश्वर गोशाळा (कुंडेश्वर) २ टन

एकूण चारा वाटप १२ टन

हा उपक्रम केवळ फाऊंडेशनचा नसून समाजातील संवेदनशील नागरिकांच्या साथीमुळेच यशस्वी झाला आहे. या अत्यंत महत्त्वाच्या आणि विधायक कामी ज्या ज्या दानशूर व्यक्तींनी आर्थिक व स्वरूपात्मक सहकार्य केले, त्या सर्व दात्यांचे हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशनच्या वतीने मनापासून धन्यवाद मानण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी फाउंडेशनच्या उपाध्यक्षा नाजनीन शेख, सचिव अमर टाटीया, संचालक संतोष सांडभोर, दिलीप होले, सुनील वाळुंज, राहुल मलघे, संगीता तनपुरे आणि प्रियांका दिघे यांनी विशेष परिश्रम घेतले व ते यावेळी उपस्थित होते.

फाऊंडेशनने सालाबादप्रमाणे गोशाळेतील मुक्या जनावरांप्रती दाखवलेली ही कृतज्ञता सध्या संपूर्ण परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

"तालुक्यातील गोशाळेतील मुक्या जनावरांना अजूनही चारा वाटप करण्यात येणार असून, या विधायक उपक्रमासाठी नागरिकांनी यथाशक्ती दान करावे, असे आवाहन हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशनचे सचिव अमर टाटीया यांनी केले.

## विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**आळंदी (दै. संध्या)**

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज विद्यालयातील (पीएमसी ९९जी) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५–२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील १६ विद्यार्थ्यांनी अर्ज केला होता. त्यापैकी १४ विद्यार्थी परीक्षेला बसले असून १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या यशामध्ये मार्गदर्शक शिक्षक स्नेहल गायकवाड, भाग्यश्री झोंड आणि विठोबा पादिर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच मुख्याध्यापक श्री. अशोक नामदेव लंघे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

यावेळी मुख्याध्यापक अशोक लंघे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे हे यश संपादन केले आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांनी अधिक मेहनत घेऊन मोठे यश मिळवावे, हीच अपेक्षा आहे."

परीक्षेतील अव्वल विद्यार्थ्यांमध्ये मोहम्मद अर्शान रईस शेख याने २१४ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.

प्रिन्सकुमार उमेश साहा याने २१० गुणांसह द्वितीय, तर मधास्वाड साईनाथ पांडुरंग याने १९८ गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. तसेच गौड भावना राजेश (१८६) आणि गौड पलक शारदाप्रसाद (१८४) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले.

या यशाबद्दल पर्यवेक्षक मीना भेंडारी, शैला ठाकूर, स. प्रशासकीय अधिकारी विजय आवारी, उपप्रशासकीय अधिकारी शुभांगी चव्हाण, प्रशासकीय अधिकारी सुनंदा वाखारे तसेच उपआयुक्त वसुंधरा बर्वे यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन केले.

## बारामतीत गॅस तुटवड्याच्या नावाखाली काळाबाजार

### जादा दराने विक्री करणाऱ्यांवर कारवाईची मागणी



**बारामती (दै. संध्या)**

बारामती शहर व तालुक्यात घरगुती तसेच व्यावसायिक गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून काही गॅस एजन्सी चालक, वितरक व संबंधित व्यावसायिकांकडून मोठ्या प्रमाणावर गॅस सिलेंडरचा साठा करून काळाबाजार केला जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. यामुळे सामान्य नागरिक, छोटे व्यावसायिक तसेच हॉटेल व्यवसायिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कांबळे, मन्सूर शेख आणि निलेश जाधव यांनी तहसीलदार तथा पुरवठा अधिकारी, बारामती यांच्याकडे निवेदन देऊन संबंधित प्रकाराची तात्काळ चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, काही ठिकाणी ग्राहकांना वेळेवर गॅस सिलेंडर उपलब्ध करून दिले जात नसून कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात आहे. त्याचबरोबर शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक रक्कम आकारून गॅस सिलेंडरची विक्री केली जात असल्याचे प्रकारही समोर येत आहेत. व्यावसायिक वापरासाठी असलेले गॅस सिलेंडर अवैधरित्या साठवून जादा दराने विक्री केल्यामुळे नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर प्रकार हा अत्यावश्यक वस्तू अधिनियम तसेच शासनाच्या पुरवठा नियमांचे उल्लंघन करणारा असून यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. सामान्य नागरिकांच्या हितासाठी प्रशासनाने या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कांबळे, मन्सूर शेख आणि निलेश जाधव यांनी केली आहे.

### प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे

- बारामती शहर व तालुक्यातील गॅस एजन्सी, गोदामे व संशयित ठिकाणी तात्काळ छापेमारी करण्यात यावी.
- व्यावसायिक वापरासाठी असलेल्या गॅस सिलेंडरचा अवैधरित्या साठा करणाऱ्यांची चौकशी करण्यात यावी.
- जादा दराने गॅस विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.
- नागरिकांना शासनाच्या निर्धारित दरानुसार नियमित गॅस पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात.
- दोषी आढळणाऱ्या एजन्सी किंवा संबंधित व्यक्तींचे परवाने निलंबित करून कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

## पुरंदर तालुक्यातील मांडकी येथे २८ लाखाचा चंदनसाठा जप्त

### पुणे ग्रामीण एटीएस पथकाची कामगिरी

**जेजुरी (दै. संध्या)**

पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) सोमवार दिनांक १८ मे रोजी मांडकी ता.पुरंदर येथे छापा टाकून सुमारे २८ लाख रूपयांचा चंदनसाठा जप्त केलेला आहे. पुणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांचे आदेशा नुसार दहशतवाद विरोधी शाखेचे पथकाने जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीत वेशांतर करून संशयित आरोपीचा शोध घेताना वाल्हे येथे सदर पथकास एका खबऱ्यामार्फत, मांडकी, पाटील वस्ती ता.पुरंदर जि.पुणे येथे विलास भोसले यांचे शेतात मोठ्या प्रमाणात चोरीचे चंदनाचा साठा लपवून ठेवला असल्याची बातमी मिळाली होती. त्यानुसार जेजुरी पोलीस स्टेशन मधील कर्मचारी मदतीसाठी घेऊन मांडकी येथे विलास रावजी भोसले यांचे शेतात जावून शोध घेतला असता तेथे हिरवे कापडाच्या खाली लपवून ठेवलेले ५६० किलो वजनाचे चंदनाचे कापून ठेवलेले लाकडी ओंडके एकूण २८,०५,२०० रुपये किमतीचा माल पोलिसांनी जप्त केला आहे.

शेतीमालक विलास रावजी भोसले यांच्याकडे चौकशी केली सदरचे चंदन हे त्यांचा भाचा प्रतिक प्रमोद खुंटे रा.मांडकी, पाटीलवस्ती ता. पुरंदर जि.पुणे याने ठेवले असल्याचे सांगितले. त्याचा शोध घेतला असता तो पोलिसांना मिळून आला नाही. याबाबत निष्पन्न आरोपी प्रतिक प्रमोद खुंटे याचेवर जेजुरी पोलीस स्टेशनला बी.एन.एस, भारतीय वन अधिनियम सह महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली असून पुढील तपास चालू आहे.



गुन्ह्यातील आरोपी प्रतिक खुंटे हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी सातारा जिल्ह्यात जबरी चोरीसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

ही कारवाई पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल्ल व बारामती अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, जेजुरी पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांचे मार्गदर्शनाखाली दहशतवाद विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महेश गायकवाड, विशाल गव्हाणे, पोलीस हवालदार निलेश कदम, रविंद्र जाधव, पोलीस अंमलदार मोसीन शेख, ओंकार शिंदे, जालिंदर मुळीक व जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक केशव जगताप यांचे पथकाने केलेली आहे.

## मोफत आर्ट अँड क्राफ्ट ड्रॉइंग समर कॅम्पचे आयोजन

**नारायणगाव (दै. संध्या)**



राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान व ग्रामपंचायत नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 5 ते 15 वर्ष वयोगटातील लहान मुलांसाठी खास मोफत आर्ट अँड क्राफ्ट ड्रॉइंग समर कॅम्प बुधवार दि. 20 मे 2026 ते रविवार दि. 31 मे 2026 या कालावधीत दुपारी 1 ते 2 वाजेपर्यंत श्री विरोबा हॉल पाटे आळी, नारायणगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती नारायणगावचे माजी प्रथम लोकनियुक्त सरपंच तथा विद्यमान उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे यांनी दिली. या शिबिरात प्रशिक्षक संतोष भिमराव खुडे सर हे मुलांना चित्रकला हस्तकला व पेपर क्राफ्ट चे विशेष प्रशिक्षण देणार आहेत.ज्या मुलांना या शिबिरात सहभागी व्हायचे आहे त्यांनी सौ. भावना महेश बेल्हेकर (मो. नं.8766825327),सौ. सुचिता संकेत क्षीरसागर ( मो. नं.7038278382), सौ. सुप्रिया नंदू अडसरे(मो. नं.8390603103), सौ. शारदा रामदास बाळसराफ(मो. नं.9860708250), सौ. प्रिया अनिल खैरे(मो. नं.9665480811) यांच्याशी संपर्क करावा. व परिसरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या मोफत शिबिरात सहभागी होऊन आपल्या कलागुणांना वाव द्यावा,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नांदेड जिल्ह्यातील विधिज्ञांच्या अडचणी सोडविणार : ॲड. यदुपत अर्धापूरकर

**अर्धापूर (दै. संध्या)**

■ तालुका न्यायालय अर्धापूरच्या वतीने नवनिर्वाचित अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचे जंगी स्वागत व भव्य सत्कार




जिल्ह्यातील विधिज्ञांनी आमच्या अधिवक्ता एकता पॅनेलवर विश्वास दाखवून खूप मोठ्या मताधिक्यांनी आम्हाला विजयी केले आहे. येणाऱ्या काळात सर्व विधिज्ञांचे व नागरिकांच्या अडचणींत आम्ही धावुन जाणार आहोत,प्रत्येक अडचणी सोडविण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.तालुका न्यायालय अर्धापूर येथील अर्धापूर तालुका अधिवक्ता संघांनी केलेला सत्कार हा आमच्यासाठी खूप विशेष व अविस्मरणीय आहे असे प्रतिपादन नांदेड जिल्हा अधिव्यक्ता संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. यदुपत श्यामसुंदरराव देशमुख अर्धापूरकर यांनी ता.१४ गुरूवार रोजी दुपारी तालुका न्यायालय अर्धापूर येथे केले. तालुका न्यायालय अर्धापूर येथे नवनिर्वाचित जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष,पदाधिकारी व सदस्यांच्या सत्कार सोहळ्यात नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. यदुपत अर्धापूरकर,सचिव ॲड. कपील पाटील,महिला उपाध्यक्ष ॲड. दिपाली डोनगांवकर,महिला सहसचिव ॲड. सुजाता बगाटे, कोषाध्यक्ष ॲड. मंगेश जामनिक, सदस्य ॲड. मुक्ता पवार,ॲड. रामसिंग मठवाले,ॲड. प्रिती हटकर, ॲड. राजु हटकर,ॲड. बाबु गावंडे, यांचे सर्वप्रथम अर्धापूर बसस्थानक येथे आगमन झाले की,फटके फोडत ढोल,ताशे व बॅन्डच्या गजरात अर्धापूर न्यायालयाच्या कमानी समोर आगमन करून तिथे तात्काळ अभिनंदनाचे बॅनर लावून परत फटाके फोडून न्यायालयामध्ये आगमन केले.

कार्यक्रमाची सुरूवात अधिवक्ता हॉल क्र.२४ मध्ये करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्धापूर न्यायालयाच्या आदरणीय न्यायाधीश श्रीमती.आर. बी.सोरेकर ह्या होत्या.सर्वप्रथम नवनियुक्त नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. यदुपत अर्धापूरकर यांचे आजोबा कै.ॲड. श्यामसुंदरराव व्यंकटराव देशमुख अर्धापूरकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित सर्वांच्या हस्ते करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर नवनियुक्त नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. यदुपत श्यामसुंदरराव देशमुख अर्धापूरकर यांचा सत्कार या कार्यक्रमाच्या अध्यक्षा न्यायाधीश आर.बी.सोरेकर मॅडम यांच्या हस्ते करण्यात आला व त्यानंतर न्यायाधीश सोरेकर मॅडम यांचा सत्कार नवनियुक्त नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. यदुपत अर्धापूरकर यांच्या हस्ते करण्यात आला.त्यानंतर अधिवक्ता संघ अर्धापूरचे कोषाध्यक्ष ॲड. जी. बी.पत्रे,अधिवक्ता एकता पॅनलच्या विजयी ॲड. मुक्ता पवार,ॲड. दिपाली डोणगांवकर,ॲड. अभिजीत पांडे आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले व शेवटी अधिवक्ता संघ अर्धापूरच्या वतीने केलेल्या जंगी स्वागत व सत्काराला नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे नवनियुक्त अध्यक्ष ॲड. यदुपत श्यामसुंदरराव देशमुख अर्धापूरकर यांनी सत्काराला उत्तर देताना म्हणाले की, अर्धापूर हे माझे असून मी अर्धापूरचा आहे त्यामुळे वकिलांच्या बाबतीत मी कधीही कोणत्याच कामात कमी पडणार नाही.मी अध्यक्ष म्हणून निवडून येण्याच्या पुर्वीही वकिलांची कामे करित आलो,अध्यक्ष असतांनाही करणार व पुढे चालून अध्यक्ष नसतांनाही वकिलांची कामे नेहमी करणारच असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.यावेळी उपस्थित अधिवक्ता संघ अर्धापूरचे सचिव ॲड. डि.एम. लोणे,ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. डि.बी.दासे, ॲड. ए.आर.चाऊस,ॲड. बी.व्ही. नवले,सहाय्यक सरकारी अभिवक्ता विशाल परदेशी, ॲड. नितेश लोणे, ॲड. दिलीप मोरे,राजेश्वर देशमुख, मुंजाजी कुर्हे,तजम्मुल खान यासह न्यायालयीन कर्मचारी गोविंद वाघमारे,राम चिकाळकर व इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुंदर, उत्कृष्ट व नियोजनबद्ध सुत्रसंचलन अधिवक्ता संघ अर्धापूरचे सदस्य ॲड. गौरव उध्दवराव सरोदे यांनी केले तर उत्कृष्ट आभार प्रदर्शन ॲड.सय्यद इम्रान यांनी करून हा कार्यक्रम नियोजनबद्ध रित्या सर्व विधिज्ञांनी यशस्वी पार पाडला.

# आरोग्य सेवांमध्ये गुणवत्ता व गतीला प्राधान्य द्या - मुख्यमंत्री फडणवीस

## मुख्यमंत्री वॉर रुम अंतर्गत आरोग्य विषयक योजनांचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा; केंद्र-राज्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी

मुंबई (दै. संध्या)

राज्यातील नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येत आहे. राज्यातील आरोग्यसेवा परिणामकारक, दर्जेदार आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करत प्रधानमंत्री आयुष्मान आरोग्य मंदिर, क्रिटिकल केअर ब्लॉक आणि प्रयोगशाळांच्या उभारणीची कामे निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण करावीत,असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सामाजिक क्षेत्रातील योजनांच्या पाठपुराव्यासाठी मुख्यमंत्री वॉररुमची स्थापना करण्यात आली आहे. या वॉर रुम अंतर्गत आरोग्य विभागाच्या केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनांचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव निपुण विनायक, आयुक्त कादंबरी बलकवडे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ तसेच राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त तसेच नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

केंद्र व राज्य शासनाच्या प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, 15 व्या वित्त आयोगाअंतर्गत पायाभूत आरोग्य सुविधा बळकटीकरण, प्रधानमंत्री आयुष्मान भारत हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशन, नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची उभारणी एचपीव्ही लसीकरण मोहीम आदींसह विविध प्रलंबित कामांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात शहरी आणि ग्रामीण भागात दर्जेदार व सहज उपलब्ध आरोग्य सेवा निर्माण करण्यावर शासनाचा विशेष भर आहे. यासाठी तमिळनाडूसह विविध राज्यांच्या आरोग्य व्यवस्थेचा अभ्यास करून महाराष्ट्रासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. केंद्र शासनाकडून मिळणारा निधी निर्धारित वेळेत खर्च होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आयुष्मान आरोग्य मंदिर उभारणे, क्रिटिकल केअर ब्लॉक व एकात्मिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा यांची कामे वेगाने करण्यासाठी लक्ष घालावे. सुरुवातीच्या काळात कामांमध्ये विलंब होत होता; मात्र आता जिल्ह्यांची कामगिरी समाधानकारक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी नमूद केले.

काही जिल्ह्यांची प्रगती तुलनेने कमी असली तरी सर्व जिल्ह्यांनी आता निश्चित केलेल्या वेळापत्रकात काम पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रीत करावे. प्रलंबित प्रकल्पांमध्ये विभागांमधील समन्वयाचा अभाव राहू नये, यासाठी शासन म्हणून सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कामे पूर्ण करावीत, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आरोग्य क्षेत्राला कमी प्राधान्याचे क्षेत्र समजण्याची मानसिकता बदलण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. शासनाच्या आरोग्य सुविधांमध्ये गुणवत्ता, स्वच्छता आणि चांगले ब्रँडिंग असावे. शासकीय दवाखाने म्हणजे अस्वच्छ किंवा निकृष्ट ही नागरिकांची धारणा बदलण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. मॉड्युलर तंत्रज्ञानामुळे दर्जेदार आणि वेळेत काम शक्य होत असल्याने अधिकाऱ्यांनी कल्पकतेने काम करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

पुण्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये करण्यात आलेल्या सकारात्मक बदलाचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अशा चांगल्या उपक्रमांचा इतर ठिकाणीही अवलंब व्हायला हवा. नागरिकांना शासकीय आरोग्य व्यवस्थेमध्ये गुणवत्ता जाणवली पाहिजे, यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या कामाची जबाबदारी स्वीकारून लक्ष घालावे.वैद्यकीय महाविद्यालयांच्या उभारणीमधील अडचणी तातडीने दूर करून कामांना गती देण्याचे निर्देश देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, अधिकाऱ्यांनी बैठकीत दिलेल्या मुदतींची नोंद करण्यात आली आहे. पुढील वॉर रूम बैठकीत त्याचा आढावा घेतला जाणार असून अधिकाऱ्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करणे आवश्यक राहील.

प्रश्न प्रलंबित ठेवू नका, पाठपुरावा वाढवा, असे स्पष्ट निर्देश देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, एखादा प्रश्न आपल्या स्तरावर सुटत नसेल तर विभाग प्रमुख, सचिव, मुख्य सचिव, मंत्री किंवा मुख्यमंत्री स्तरापर्यंत विषय मांडावा; मात्र काम पूर्ण होईपर्यंत शांत बसू नये. सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यास कोणतीही समस्या सुटू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी सर्व्हायकल कर्करोग प्रतिबंधासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या एचपीव्ही लसीकरण मोहिमेचाही आढावा घेण्यात आला. महाराष्ट्राला जवळपास दहा लाख मुलींच्या लसीकरणाचे उद्दिष्ट देण्यात आले असून हे उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. जिल्हास्तरावर पालकांची संमती घेऊन व्यापक जनजागृती मोहीम राबवावी आणि लक्ष्य वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

राज्यात नवीन 13 वैद्यकीय महाविद्यालयांच्या उभारणीची कामे हाती घेण्यात आली आहेत. या महाविद्यालयांच्या उभारणीत येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून कामे वेगाने पूर्ण होतील, याकडे लक्ष देण्यात यावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

---

## थोडक्यात पण महत्वाचे...



### साहित्यिक आणि समाज सेवकांचा कोमसाप उरणचा मधुबन कट्टा प्रेरणास्थान : नागेंद्र म्हात्रे

उरण (दैनिक संध्या) : साहित्यिकांच्या आणि समाज सेवकांच्या कार्याचा गौरव करून सतत साडे दहा वर्षे कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप )मधुबन कट्ट्यावर नवोदितांना प्रेरणा देण्याचे कार्य अभिनंदनीय आहे,असे विचार कोमनादेवी संस्थेचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांनी अध्यक्षीय भाषणात विचार मांडले. ते कट्ट्याच्या १२७ व्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील, चंद्रकांत मुकादम,प्रकाश म्हात्रे,बाजी घरत,भुवनेश पाटील,दत्ता निळवर्ण, रमाकांत घरत, अनंत पाटील,सुरेश गायकवाड, मिना बिस्ट,श्रुती म्हात्रे इत्यादीची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समाजसेवक रमाकांत जयराम घरत, सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र म्हात्रे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.पत्रकार विठ्ठल ममताबदे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्ता विशेष सन्मानाने गौरविण्यात आले. शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, मधुबनचे अध्यक्ष राम म्हात्रे,सचिव अजय शिवकर, केंद्रीय सचिव संजय होळकर यांनी कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली.सूत्रसंचालन शिवप्रताप पंडित यांनी केले. या प्रसंगी "सागर किनारा " या विषयावर कविसंमेलन घेण्यात आले, त्यावेळी बालकवी अनुप शिवकर,भरत पाटील,अनिल भोईर,संपदा ठाकूर, संजीव पाटील,न.ग. पाटील,मारुती तांबे, नामदेव पाटील अजय शिवकर, भालचंद्र म्हात्रे, संग्राम तोगरे, सुरेश मेस्त्री इ.१६ कवींनी कविता सादर केल्या. होळकर संजय यांनी आभार मानले.



### राज्यपाल जिष्णू देव वर्मांची दिव्यांग व अनाथ मुलांच्या काष्ठ कलाकृती प्रदर्शनाला भेट

मुंबई (दैनिक संध्या) : मतिमंद व अनाथ मुलांचे पालक शंकरबाबा पापळकर यांनी मुंबईत आयोजित केलेल्या काष्ठशिल्प कलाकृतींच्या प्रदर्शनाला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी भेट दिली व दिव्यांग कलाकारांनी तयार केलेल्या कलाकृतींचे अवलोकन केले. यावेळी राज्यपालांनी काष्ठशिल्प कलाकारांशी संवाद साधला तसेच शंकरबाबा पापळकर यांच्या कार्याचे कौतुक केले. शंकरबाबा पापळकर यांनी यावेळी राज्यपालांना विविध काष्ठशिल्पांच्या वैशिष्ट्यांची माहिती दिली. शंकरबाबा पापळकर तसेच पु ल देशपांडे अकादमीच्या संचालिका मीनल जोगळेकर यांनी राज्यपालांचे स्वागत केले. पद्मश्री शंकर बाबा पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्व. अंबादास पंत वैद्य बेवारस दिव्यांग बालगृह, वझ्झर, जिल्हा अमरावती येथील अनाथ मुलांनी सागवान व बेल आदी लाकडापासून विविध काष्ठशिल्पे साकारली असून या कलाकृती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहे.

### नंदुरबार जिल्ह्यातील अवकाळीग्रस्तांना दिलासा

नंदुरबार (दैनिक संध्या) : मार्च-2026 दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. जिल्ह्यातील 953 बाधित शेतकऱ्यांसाठी 66 लाख 57 हजार रुपयांच्या मदतीस मंजुरी देण्यात आली आहे. या मदतीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आगामी हंगामासाठी आधार मिळणार असून शेती पुनर्बांधणीस मदत होणार आहे. महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार मार्च-2026 या कालावधीत राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यभरातील बाधित शेतकऱ्यांसाठी एकूण 164 कोटी 83 लाख 44 हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

---

# महाराष्ट्र शासनाचे २८ वर्षे मुदतीचे १६०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या २८ वर्षे मुदतीच्या १६०० कोटींच्या ७.७९ % महाराष्ट्र शासनाचे रोखे २०५४ च्या (दि.२२ एप्रिल २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. 19 मे २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् 19 मे २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २० मे २०२६ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी २८ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी २२ एप्रिल २०२६ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड २२ एप्रिल २०५४ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर हा ७.७९ % दरसाल दर शेकडा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी २२ ऑक्टोबर आणि २२ एप्रिल रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल. शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

---



## गॅस वितरणाच्या संतापातून नायगावात चक्काजाम

नायगाव (दै. संध्या)

नायगाव शहरातील डॉ. हेडगेवार चौक येथे गॅस वितरणातील विलंबामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी सोमवारी सकाळी अचानक चक्काजाम आंदोलन केले. यामुळे नांदेड-हैदराबाद महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णतः विस्कळीत झाली. रिकाम्या गॅस टाक्या थेट रस्त्यावर टाकून नागरिकांनी रास्ता रोको केल्याने महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

आज सकाळी सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास हे आंदोलन उफाळून आले. गॅससाठी ऑनलाईन नोंदणी करून OTP प्राप्त झाल्यानंतरही १०-१० दिवस घरपोच सिलिंडर मिळत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला. वारंवार पाठपुरावा करूनही गॅस वितरणात सुधारणा होत नसल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला होता.

दरम्यान, गॅस वितरणाबाबत विचारणा करण्यासाठी काही नागरिक शगुन इंडियन कार्यालयात गेले असता कार्यालय बंद असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संतप्त नागरिकांनी थेट डॉ. हेडगेवार चौक गाठत रिकाम्या गॅस टाक्या रस्त्यावर ठेवून आंदोलन सुरू केले. अचानक उभारलेल्या या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

---

# बुरोंडी येथे मच्छीमार जेट्टी उभारणी प्रस्तावास गती - नितेश राणे

रत्नागिरी (दै. संध्या)

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील बुरोंडी येथे मच्छीमार जेट्टी उभारणीच्या प्रस्तावाला गती देण्यात आली आहे. बुरोंडी परिसरातील मच्छीमारांच्या विविध समस्या, जेट्टी उभारणीची आवश्यकता तसेच मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.



बुरोंडी (ता.दापोली) मच्छीमार जेट्टी संदर्भात आयोजित बैठकीत मत्स्यव्यवसाय मंत्री राणे बोलत होते. यावेळी माजी आमदार सूर्यकांत दळवी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, केदार साठे, शिवानी गावकर, स्थानिक मच्छीमार संस्थांचे प्रतिनिधी आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले, रत्नागिरी जिल्हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा सागरी जिल्हा असून जिल्ह्याला तब्बल २३७ किलोमीटरचा सागरी किनारा लाभला आहे. मिरकरवाडा बंदरानंतर दापोली तालुक्यातील हर्णे बंदराला विशेष महत्त्व आहे. हर्णे, दाभोळ आणि बुरोंडी ही मासळी उतरविण्याची प्रमुख केंद्रे मानली जातात.

बुरोंडी येथील मच्छीमारांच्या समस्या शासनाच्या निदर्शनास आल्या असून मच्छीमारांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि मत्स्य व्यवसाय अधिक सक्षम करण्यास राज्य शासनाचे प्राधान्य आहे. बुरोंडी येथे जेट्टी उभारल्यास वाहतूक खर्च कमी होईल, मासळीचा दर्जा टिकून राहील आणि स्थानिक मच्छीमारांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होईल. जेट्टीमुळे मच्छीमारांना मासळी थेट उतरविणे शक्य होईल. डिझेल, पाणी आणि इतर साहित्य सहज उपलब्ध होईल. वादळी हवामानात नौकांना सुरक्षित आश्रय मिळेल. तसेच पर्यटन आणि व्यापारानाही चालना मिळून स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील असे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले. फिशरीज अँड ॲक्वाकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड (एफआयडीएफ) या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत हर्णे मत्स्य बंदर विकासाचे काम सुरू असून, त्याच धर्तीवर बुरोंडी येथेही आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे प्रयत्न केले जात आहे. बुरोंडी जेट्टी प्रकल्पामुळे दापोली तालुक्यातील मत्स्य व्यवसायाला मोठी चालना मिळणार असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री राणे यांनी सांगितले.


बुरोंडी हे मोठे मच्छीमार गाव असून येथील लोकसंख्या ७ ते ८ हजारांच्या दरम्यान आहे. गावात नोंदणीकृत मच्छीमार सहकारी संस्था कार्यरत असून २५०२ सभासद या संस्थेशी जोडलेले आहेत. बुरोंडी परिसरात सुमारे १०० नोंदणीकृत मासेमारी नौका असून त्यामध्ये एक व दोन सिलेंडरच्या नौकांची संख्या अधिक असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

---

# उरुळी कांचनमध्ये स्ट्रीट लाईट व्यवस्थेचा बोजवारा

उरुळी कांचन (दै. संध्या)

उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील विविध भागांमध्ये स्ट्रीट लाईट व हायमास दिवे दिवसभर सुरू असल्याचे चित्र गेले चार दिवसांपासून पाहायला मिळत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात विजेचा अपव्यय होत असून ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.



तुपे वस्ती रोड, प्रयागधाम रोड बगाडे वस्ती तसेच स्मशानभूमी रोड परिसरातील स्ट्रीट लाईट गेले चार दिवसांपासून दिवसभर सुरू असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. तसेच उरुळी कांचन रेल्वे स्टेशन परिसरातील हायमास दिवे देखील दिवसाढवळ्या सुरू असल्याने प्रशासनाच्या दुर्लक्षाचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. एकीकडे शासनाकडून वीज बचतीचे आवाहन केले जात असताना दुसरीकडे ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणामुळे सार्वजनिक विजेचा अपव्यय होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. "या वाढीव विज बिलाचा फटका अखेर सर्वसामान्य नागरिकांनाच बसणार का?" असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे दिवसा सुरू असलेल्या या लाईट्समुळे ग्रामपंचायतीच्या देखभाल यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामपंचायतीने तातडीने दखल घेऊन संबंधित यंत्रणा दुरुस्त करावी अशी मागणी नागरिकांनी केले आहे.

गावातील अनेक ठिकाणी दिवसाढवळ्या स्ट्रीट लाईट तसेच हायमास दिवे सुरूच, ग्रामपंचायतीच्या हलगर्जी कारभारामुळे वीजेची मोठ्या प्रमाणात नासाडी, या अनावश्यक दिवाबत्तीमुळे ग्रामपंचायतीच्या वीजबिलात वाढ, त्याचा आर्थिक भार अप्रत्यक्षपणे नागरिकांवर पडणार?, संबंधित विभागाकडून योग्य देखरेख होत नसल्याने दिवे दिवसभर सुरूच, एकीकडे वीज बचतीचे आवाहन तर दुसरीकडे सार्वजनिक पैशांची उधळपट्टी?

कर्मचाऱ्यांना बोलून स्ट्रीट लाईट संदर्भात सूचना दिल्या आहेत. त्वरित उपयोजना करून स्ट्रीट लाईट, हायमास लाईट सुरळीत करण्यात येईल.
**- तुकाराम पाटील,**
**ग्रामविकास अधिकारी,**
**उरुळी कांचन ग्रामपंचायत**

## थोडक्यात पण महत्वाचे...



## अक्षरसृष्टी संस्थेच्या माध्यमातून 500 दिव्यांग बांधवांना रेशनिंग किट वितरण

नायगाव (दैनिक संध्या) : अक्षरसृष्टी संस्थेचे अध्यक्ष सिद्धनाथ पवार यांच्या माध्यमातून पुरंदर, बारामती व दौंड तालुक्यातील सुमारे ५०० दिव्यांग बांधवांना डोनेट कार्ड संस्था यांच्या सहकार्यातून रेशनिंग किटचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. समाजातील वंचित घटकातील सर्वसामान्य नागरिकांना मदतीचा हात देण्याचे कार्य अक्षरसृष्टी संस्था सातत्याने करत असून, विविध सामाजिक उपक्रमांद्वारे गरजूंपर्यंत मदत पोहोचवली जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमाला मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव उपस्थित होते. रेशनिंग किट वाटपामुळे लाभार्थींनी संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात सामाजिक बांधिलकी जपत गरजूंसाठी अशाच प्रकारचे उपक्रम पुढील काळातही राबविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. यावेळी डाळिंबाचे सरपंच बजरंग मस्के, काळ खैरेवाडी चे सरपंच तुषार कुतवळ, पिंगोरी चे सरपंच संदीप यादव, पांडेश्वर च्या सरपंच सविता नाळे, सिंगापूरचे उपसरपंच विक्रांत पवार, नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर, माजी मुख्याध्यापिका रोहिणी कामथे,नायगावचे माजी उपसरपंच किशोर खळदकर, सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टचे राहुल कड,सामाजिक कार्यकर्ते महेश कोलते,भाऊसाहेब कड,चंद्रकांत कड,रविंद्र जाधव, संभाजी देवकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अक्षरसृष्टी संस्था व सामाजिक कार्यकर्ते रियाज सय्यद यांनी केले.



## कोथळे तंटामुक्त अध्यक्ष सूर्यकांत जगताप यांना आदर्श ग्रामरत्न पुरस्कार

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य अठरापगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या प्रथम वर्धापन दिनसोहळ्या निमित्त पुरंदर तालुक्यातील कोथळे गावचे आदर्श तंटा तंटामुक्ती अध्यक्ष सूर्यकांत सुभाष जगताप यांना आदर्श ग्राम रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य परिवर्तन क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल लोंढे, उद्योजक गुलाबराव गायकवाड गणेश महाडिक यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगल भंडवलकर तर आभार फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर यांनी मानले. महाराष्ट्रातील अठरापगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन ट्रस्टचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## बकरी ईदमुळे चाकण बाजारात बोकडांना प्रचंड मागणी

चाकण (दैनिक संध्या) : बकरी ईद अवघ्या आठ दिवसांवर येऊन ठेपल्याने बोकडांच्या खरेदी व विक्रीसाठी चाकण येथील जनावरांचा बाजार गजबजून गेला आहे. खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्ड मधील जनावरांचा बाजार संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. येथील बाजारात अन्य राज्यातून व्यापाऱ्यांनी बोकड विक्रीसाठी आणले आहेत. तर परराज्यातील व्यापाऱ्यांची बोकड खरेदीसाठी झुंबड उडाली आहे. कोट्यावधी रुपयांची उलाढाल असलेल्या या बाजारात कपाळावर चांद असलेल्या बोकडांना प्रचंड मागणी असल्याचे खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे, सचिव बाळासाहेब धंद्रे, सहाय्यक सचिव संतोष गायकवाड, उल्हास चांभारे आदींनी सांगितले. सूर्य मोठ्या प्रमाणात आग ओकत असल्याने बोकडांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. चाकण बाजारात व्यापाऱ्यांनी खरेदी केलेले बोकड अत्याधुनिक सोयी असलेल्या वाहनांमध्ये घरी सुखरूप नेले आहेत. बोकडांचा यंदाचा बाजार मोठा भरल्याने बोकड खरेदी करताना खरेदीदार व विक्रेते यांची धांदल झाली होती. एका बोकडाची किंमत ५० हजार रुपयांपासून ते लाखो रुपयांवर पोहोचली होती.

## पिसर्वे-राजुरी पुलावरील
# खड्डे बुजविल्याने प्रवासी समाधानी

**पुरंदर (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील पिसर्वे ते राजुरी रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण काम पूर्ण झाले असले, तरी मुख्य रस्त्यावरील पुलाच्या ठिकाणी मोठ्या खड्ड्यांचा गॅप निर्माण झाल्याने वाहनचालकांसाठी गंभीर धोका निर्माण झाला होता. या ठिकाणी वारंवार लहान-मोठे अपघात घडत होते.

पुलावरून जाताना वाहनांना अचानक धक्का बसत असल्याने अनेक वाहनचालकांचे संतुलन बिघडून अपघात घडत होते. तसेच, या ठिकाणी कोणतीही सूचना फलक किंवा इशारे नसल्यामुळे अपघातांचा धोका अधिक वाढला होता. अनेक वाहनचालकांना किरकोळ दुखापतीही झाल्या होत्या.

या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नायगाव विविध



कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. यावेळी रस्त्याच्या कामावर देखरेख ठेवणारे रमेश साबळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पुलावरील खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी करण्यात आली. या भेटीत राजुरीचे माजी उपसरपंच विपुल भगत तसेच सामाजिक कार्यकर्ते सत्यवान भगत उपस्थित होते.

मागणीची दखल घेत साबळे यांनी दुसऱ्याच दिवशी पुलावरील खड्ड्यांमध्ये मुरूम टाकून गॅप बुजविण्याचे काम केले. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

> "पुलावरील खड्ड्यांचा गॅप बुजविल्याने प्रवाशांचा त्रास कमी झाला आहे. यासाठी अनेक वेळा पाठपुरावा केला होता. मात्र, अजूनही या ठिकाणी अधिक दर्जेदार आणि कायमस्वरूपी काम होणे गरजेचे आहे."
>
> **— चंद्रकांत चौंडकर, अध्यक्ष, नायगाव विविध कार्यकारी सोसायटी**



## डॉ. नीलमताई गोऱ्हे यांचे कार्य कौतुकास्पद
### युवराज दाखले

**नारायणगाव (दै. संध्या)**

पुणे येथे शिवशाही व्यापारी संघाच्या वतीने सन्मान सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात केला होता.त्यावेळी शिवसेना नेत्या व विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे यांची विधानपरिषदेवर सलग पाचव्यांदा बिनविरोध निवड झाल्याबद्दल शिवशाही व्यापारी संघाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष युवराज दाखले व भीमशक्ती-शिवशक्ती - लहुशक्ती समन्वय प्रमुख गुलाबराव गरूड यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी युवराज दाखले म्हणाले, "डॉ. नीलमताई गोऱ्हे ह्या महाराष्ट्राच्या राजकारणातील एक झुंजार व लढाऊ महिला नेतृत्व आहे. सलग पाच वेळा बिनविरोध निवडून येणे हा त्यांच्या कार्याचा व जनतेशी असलेल्या नात्याचा मोठा पुरावा आहे. महिलांचे प्रश्न, कामगारांचे हक्क व व्यापारी वर्गाच्या अडचणी सोडवण्यासाठी त्या विधानपरिषदेत नेहमीच आक्रमक भूमिका घेतात." "नीलमताई या फक्त शिवसेनेच्याच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांसाठी प्रेरणास्थान आहेत. विरोधकांनाही त्यांच्या विरोधात उमेदवार देता येत नाही, हीच त्यांची खरी ताकद आहे. नीलम ताई गो-हे नारीशक्ती म्हणून त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे. शिवशाही व्यापारी संघाच्या वतीने आम्ही त्यांचे मनापासून अभिनंदन करतो व पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो," असे युवराज दाखले यांनी सांगितले.

## आगामी दोन महिन्यांचे स्वस्त धान्य गहू, तांदूळ उपलब्ध

**कवठे येमाई (दै. संध्या)**

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील शासकीय स्वस्त धान्य दुकानदार गणेश माधवराव रत्नपारखी यांच्या दुकानात आगामी दोन महिन्यांचे स्वस्त धान्य गहू,तांदूळ उपलब्ध झाले आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून त्यांच्याकडे नोंदणी असलेल्या शिधापत्रिका धारकांची आधारकार्ड सह धान्य घेण्यासाठी गर्दी करताना पाहावयास मिळत आहे. सोमवार दि.१८ ला शिरूर तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे तालुका अध्यक्ष असलेले कवठे येमाई येथील स्वस्त धान्य



दुकानदार गणेश रत्नपारखी यांच्या स्वस्त धान्य दुकानास भेट दिली असता स्वस्त धान्य घेण्यासाठी महिला व नागरिकांची मोठी गर्दी झालेली पाहावतास मिळाली. पुढील दोन महिन्यांचे धान्य उपलब्ध झाल्याने उपस्थित शिधापत्रिका धारकांमधून सरकारचे मनोमन आभार मानले आहेत.

## जेजुरी गडावरील आपत्कालीन मार्गावर चारचाकी वाहनांना बंदी

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा मंदिर व गडावर तीर्थक्षेत्र आराखडा अंतर्गत विकास कामे सुरू आहेत. आपत्कालीन मार्गावर घाटाचे काम सुरू असून अनेक खासगी चारचाकी वाहने सोडली जात असल्याच्या तक्रारीची दखल घेवून पुरंदर तहसीलदार विक्रम राजपूत यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

जेजुरी गडावर शासनाच्या वतीने तीर्थक्षेत्र आराखडा राबविला जात असून जुनी जेजुरी तून गडावर जाण्यासाठी घाट रस्त्यावर दगडी फरशी वापरून रस्ता तयार करण्याचे काम सुरू आहे.भाविकांची सुरक्षिततेसाठी




**तहसिलदार कार्यालयाकडून दखल**

चारचाकी वाहनांसाठी हा घाट मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

असे असताना जुनी जेजुरी येथील प्रवेश मार्गातून खाजगी चारचाकी वाहने गडावर घाट मार्गाने सोडली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.यामुळे या आपत्कालीन मार्गावर दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त करून तहसीलदार कार्यालयात याबाबत सामाजिक कार्यकर्ते गिरीश झगडे यांनी निवेदन दिले होते.

या तक्रारीची दखल घेवून पुरंदरचे तहसीलदार विक्रम राजपूत यांनी जेजुरी पोलीस स्टेशन व श्री मार्तंड देवसंस्थान कार्यालयाला याबाबत योग्य ती कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने या घाट रस्त्याचे काम सुरू असून चारचाकी वाहने ये-जा करण्यास बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## प्रा. संजय भेंडे यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचे ज्येष्ठ संचालक तसेच प्रा.संजय भेंडे यांची नुकतीच महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेवर आमदार म्हणून नियुक्ती करण्यात आल्याबद्दल नागपूर येथे त्यांच्या भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष बी. बी. कड यांची विशेष उपस्थिती लक्षवेधी ठरली.

नागपूर नागरिक सहकारी बँक यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला सहकार, बँकिंग आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.




कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी भूषविले. तसेच महाराष्ट्राचे महसूलमंत्री व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी ज्योतिंद्र मेहता, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचे संचालक तथा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सहकार क्षेत्रातील नेतृत्व आणि संघटनात्मक कार्यामुळे ओळख असलेले बी. बी. कड यांनी कार्यक्रमादरम्यान प्रा. संजय भेंडे यांचे अभिनंदन करत त्यांच्या आगामी राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सहकार क्षेत्रातील अनुभवी नेतृत्वाला विधानपरिषदेत प्रतिनिधित्व मिळणे ही राज्याच्या सहकार चळवळीसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी प्रा.संजय भेंडे यांच्या सहकार, बँकिंग आणि सामाजिक क्षेत्रातील कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## कवठे येमाई गावठाणात घरासमोरून मोटारसायकल चोरी

**कवठे येमाई (दै. संध्या)**

शिरूरच्या पश्चिम भागातील कवठे येमाई गावठाणातील घरासमोरील मोकळ्या जागेत उभी केलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना नुकतीच घडली आहे. याप्रकरणी निखिल गजानन नेवासकर,वय ३३, व्यवसाय - खासगी नोकरी, रा. कवठे येमाई, ता. शिरूर, जि.पुणे यांनी शिरूर पोलिसांत फिर्याद दिली आहे.त्यानुसार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नुसार दि. १६ रोजी रात्री १० ते दि. १७ एप्रिल २०२६ सकाळी नऊच्या दरम्यान नेवासकर यांच्या कवठे येमाई येथील राहत्या घरासमोरील मोकळ्या जागेतून अज्ञात चोरट्याने होंडा कंपनीची सी.बी. युनिकॉर्न मॉडेलची काळ्या रंगाची मोटारसायकल एम एच १२आर जे १५९४ ही दुचाकी चोरी करून नेली. मोटारसायकलची अंदाजे किंमत ३० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी शिरूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस हवालदार पालवे हे करीत आहेत.

# पी १ पी २ टोइंग व्हॅन कारवाईला स्थगिती

**चाकण (दै. संध्या)**

चाकण शहरातील पी १ - पी २ परिसरात सुरू असलेल्या टोइंग व्हॅन कारवाईमुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर धास्ती निर्माण झाली होती. सर्वसामान्य वाहनधारकांना अचानक होणाऱ्या कारवाईमुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. दंडात्मक कारवाईची पद्धत, संवादाचा अभाव आणि पर्यायी पार्किंग व्यवस्थेची कमतरता यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली होती.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व चाकण नगरपरिषदेचे गटनेते नितीन गोरे यांनी हा विषय अत्यंत गांभीर्याने घेतला. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत त्यांनी संबंधित पोलीस प्रशासन, वाहतूक विभाग आणि स्थानिक अधिकाऱ्यांशी सातत्याने बैठका घेत पाठपुरावा केला. कारवाईमुळे सर्वसामान्य नागरिकांना होणारा त्रास, स्थानिक



**चाकणकरांना दिलेला शब्द पाळला**

व्यापारावर होणारा परिणाम आणि सामाजिक असंतोष याबाबत ठाम भूमिका नितीन गोरे यांच्याकडून मांडण्यात आली.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास देखील हा विषय आणून देण्यात आला. शहरातील परिस्थितीची सविस्तर माहिती देत नागरिकांना दिलासा देण्याची मागणी करण्यात आली. त्यानुसार त्यांनी तातडीने हस्तक्षेप करून पिंपरी - चिंचवडचे पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांना फोनवर सूचना केल्या. त्यानुसार पी १ - पी २ परिसरातील टोइंग व्हॅन कारवाईला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे चाकण शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. व्यापारी व उद्योग क्षेत्रातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. हा निर्णय म्हणजे नागरिकांच्या भावना आणि लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

दरम्यान, शहरातील वाहतूक शिस्त अबाधित राहावी यासाठी पर्यायी उपाययोजना, नियोजनबद्ध पार्किंग व्यवस्था आणि समन्वयातून उपाय काढण्यावर भर दिला जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. सर्व नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

> स्वतंत्र पार्किंग व्यवस्था नसताना अशी कारवाई करणे योग्य नाही. चाकणकरांना दिलेला शब्द आम्ही पाळला आहे. नागरिकांच्या हितासाठी पुढेही ठाम भूमिका घेऊ. चाकण शहराचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास राहील.
>
> **- नितीन गोरे, नगरसेवक, चाकण.**